# Mr. Baba Kalyani receives the Punyabhushan Award

**MEDIA DOSSIER**

**June 4, 2022**

**Print Coverage**

| No. | Publication/Portal | Headline | Date |
|---|---|---|---|
| 1 | Financial Express | 50 yrs at helm of Bharat Forge: MD says company to grow multifold | 5 June 2022 |
| 2 | Financial Express | Electric motorcycle roll out this month; next e-trucks: Kalyani | 6 June 2022 |
| 3 | Hindustan Times | Electric motorcycle roll out this month; next e-trucks: Kalyani | 6 June 2022 |
| 4 | Times of India | India to be net defence exporter by 2030: Kalyani | 3 June 2022 |
| 5 | Times of India | Gadkari: Econationalism required to trim imports | 5 June 2022 |
| 6 | Saamana | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 3 June 2022 |
| 7 | Saamana | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 5 June 2022 |
| 8 | Loksatta | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 3 June 2022 |
| 9 | Loksatta | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 5 June 2022 |
| 10 | Loksatta | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 5 June 2022 |
| 11 | Maharashtra Times | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 3 June 2022 |
| 12 | Maharashtra Times | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 5 June 2022 |
| 13 | Pudhari | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 3 June 2022 |
| 14 | Pudhari | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 5 June 2022 |
| 15 | Kesari | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 3 June 2022 |

| | | | |
|---|---|---|---|
| 16 | Kesari | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 5 June 2022 |
| 17 | Punyagiri | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 3 June 2022 |
| 18 | Aaj Ka Anand | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 3 June 2022 |
| 19 | Aaj Ka Anand | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 5 June 2022 |
| 20 | Rashtrasanchar | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 3 June 2022 |
| 21 | Rashtrasanchar | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 5 June 2022 |
| 22 | Rashtrasanchar | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 5 June 2022 |
| 23 | Sakal | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 3 June 2022 |
| 24 | Sakal | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 5 June 2022 |
| 25 | Prabhat | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 3 June 2022 |
| 26 | Lokmat | Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | 5 June 2022 |

| Headline: 50 yrs at helm of Bharat Forge: MD says company to grow multifold | Publication : Financial Express |
|---|---|
| Date : June 5, 2022 | Journalist: Geeta Nair |

# Bharat Forge set to grow multifold: Baba Kalyani

GEETA NAIR
Pune, June 4

**IT TOOK FORGING** company Bharat Forge 61 years to reach an annual turnover of ₹10,000 crore. Chairman and managing director Baba Kalyani is confident of the next ₹10,000 crore coming at a faster pace, with the company set to double or triple turnover in the next 10 years. Having joined the company started by his father Neelakanth Kalyani 50 years ago, Baba Kalyani, 73, says the past 10 years have been the busiest in his life. "If you have a passion to do something then many things can be done," he says as he celebrates five decades at the helm of Bharat Forge.



Bharat Forge chairman & MD Baba Kalyani

**Details on Page 2**

# 50 yrs at helm of Bharat Forge: MD says company to grow multifold

GEETA NAIR
Pune, June 4

**IT TOOK FORGING COMPANY** Bharat Forge 61 years to reach an annual turnover of ₹10,000 crore. Chairman and managing director Baba Kalyani is confident of the next ₹10,000 crore coming at a faster pace, with the company set to double or triple turnover in the next 10 years.

Having joined the company started by his father Neelakanth Kalyani 50 years ago, Baba Kalyani, 73, says the past 10 years have been the busiest in his life. "If you have a passion to do something then many things can be done," he says as he celebrates 50 years at the helm of Bharat Forge, which now has facilities spread across continents and is part of the $3-billion Kalyani Group, shipping 600,000 tonne with digitised manufacturing and industry 4.0 at work. Emerging technologies and an opportunity to play in these segments excite Kalyani, a BITS Pilani and Boston MIT alumni.

Bharat Forge is no longer just a forging or auto component manufacturing company, but a technology company, says Kalyani. With a presence in auto, defence, aerospace, oil and gas, electric mobility, railways and renewable energy, Kalyani says they are in the business of providing safety and security for mobility, energy and for the country.

The company is working vigorously in the electric vehicle business through a subsidiary company, Kalyani Powertrain. A new factory is all set to roll out the Tork electric motorcycles this month. Next will be an electric truck, says Kalyani. Technology centres in Detroit and Los Angeles are working on e-mobility.



Bharat Forge chairman & MD Baba Kalyani

> The past 10 years have been the busiest in my life. If you have a passion to do something, then many things can be done

Nobody is going to give you technology and especially not in the defence sector. This thought propelled him to invest in the Advanced Towed Artillery Gun System (ATAGs) programme eight years ago and tap the opportunities in the country's indigenisation programme. Armed with Bharat Forge's expertise in metallurgy, Kalyani built the full-Indian ATAGs (155mm X 52) caliber with the capability to fire 48 km compared to the existing 39-km range guns. Kalyani Strategic Systems, the defence arm of Bharat Forge, has completed multiple trials across the terrain. Kalyani is hopeful of getting his first order this year. The goal is to be the largest artillery player in 10 years. There is the armoured car, Kalyani M4, that is already operating at high altitudes (20,000 ft) and in the pipeline are drones and other products.

'Do things that others had not imagined and keep innovating' is the motto that has led to the company leading the industry and staying there unchallenged for two decades.

Fifty years ago, when he joined the business, Kalyani realised that they would have to compete based on technology and decided to move away from the conventional hammer to the modern press technology. The 80s were a tough time to import machines; so, they bought used machinery from abroad, refurbished, retrofitted, and modernised them. He invested in creating scale far beyond what a company of this size could imagine. Critics called it the white elephant. But this scale proved to be the turning point to making it the largest forging company.

A foray into the international markets when Indian manufacturing was yet to be accepted or recognised laid the foundation of the company's global business. Bharat Forge is India's first multinational, says Kalyani. The company has 10 manufacturing locations across India, Germany, Sweden, France and North America. He succeeded while many others fell by the wayside in international markets. "To be a global company and operate in advanced economies like the US and Europe you need the right mindset but people get intimidated by what is happening there and the scale of technology," points out Kalyani.

"By 2030, India will be a very different country from what it is now. Our GDP can be around $7-8 trillion," he says. Climate change and the shift to digital manufacturing would pose significant challenges, he adds. "The country historically has a talent pool that is based on analog technology and there is an immediate need to convert the existing talent pool to digital," adds Kalyani. The workforce at Bharat Forge has completed their training in Industry 4.0 and not many want to leave despite multiple rounds of VRS.

Kalyani was felicitated in Pune on Saturday and conferred the 'Punyabhushan' award to celebrate his achievements. Despite awards and recognition across the world, to be feted and celebrated by your own city feels special, says Kalyani.

| Headline: Electric motorcycle roll out this month; next e-trucks: Kalyani | Publication : Financial Express |
|---|---|
| Date : June 6, 2022 | Journalist: Geeta Nair |

# Electric motorcycle roll out this month; next e-trucks: Kalyani

**GEETA NAIR**
PUNE, JUNE 4

IT TOOK forging company Bharat Forge 61 years to reach an annual turnover of Rs 10,000 crore. Chairman and MD Baba Kalyani is confident of the next Rs 10,000 crore coming at a faster pace, with the company set to double or triple turnover in the next 10 years.

Having joined the company started by his father Neelakanth Kalyani 50 years ago, Baba Kalyani, 73, says the past 10 years have been the busiest in his life. "If you have a passion to do something then many things can be done," he says as he completes 50 years at the helm of Bharat Forge. It is no longer just a forging or auto component manufacturing company, but a technology company, says Kalyani. With a presence in auto, defence, aerospace, oil and gas, electric mobility, railways and renewable energy, Kalyani says they are in the business of providing safety and security for mobility, energy and for the country.

The company is working vigorously in the electric vehicle business through a subsidiary company, Kalyani Powertrain. A new factory is all set to roll out the Tork electric motorcycles this month. Next will be an electric truck, says Kalyani. Technology centres in Detroit and Los Angeles are working on e-mobility.



**Bharat Forge chairman and MD Baba Kalyani on Saturday.** *Pavan Khengre*

Nobody is going to give you technology and especially not in the defence sector. This thought propelled him to invest in the Advanced Towed Artillery Gun System (ATAGs) programme eight years ago and tap the opportunities in the country's indigenisation programme. Armed with Bharat Forge's expertise in metallurgy, Kalyani built the full-Indian ATAGs (155mm X 52) caliber with the capability to fire 48 km compared to the existing 39-km range guns. Kalyani Strategic Systems, the defence arm of Bharat Forge, has completed multiple trials across the terrain. Kalyani is hopeful of getting his first order this year. The goal is to be the largest artillery player in 10 years. There is the armoured car, Kalyani M4, that is already operating at high altitudes (20,000 ft) and in the pipeline are drones and other products.

'Do things that others had not imagined and keep innovating' is the motto that has led to the company leading the industry and staying there unchallenged for two decades.

"By 2030, India will be a very different country from what it is now. Our GDP can be around $7-8 trillion," he says. Climate change and the shift to digital manufacturing would pose significant challenges, he adds. "The country historically has a talent pool that is based on analog technology and there is an immediate need to convert the existing talent pool to digital," adds Kalyani. The workforce at Bharat Forge has completed their training in Industry 4.0 and not many want to leave despite multiple rounds of VRS.

Kalyani was felicitated in Pune on Saturday and conferred the 'Punyabhushan' award to celebrate his achievements. FE

| Headline: Electric motorcycle roll out this month; next e-trucks: Kalyani | Publication : Hindustan Times |
|---|---|
| Date : June 6, 2022 | Journalist: |



Baba Kalyani (fourth from left), chairman and managing director of Bharat Forge, was conferred with the 'Punyabhushan' award. (From left) Raghunath Mashelar, Prakash Javadekar, Nitin Gadkari, Girish Bapat and Srinivas Patil during the event at Balgandharva Ranga Mandir on Saturday. HT PHOTO

| Headline: India to be net defence exporter by 2030: Kalyani | Publication : Times of India |
|---|---|
| Date : June 3, 2022 | Journalist: Shiladitya Pandit |

# India to be net defence exporter by 2030: Kalyani

Shiladitya.Pandit
@timesgroup.com

**Pune:** Industrialist Baba Kalyani on Thursday said India would be a net defence equipment exporter by 2030 in view of its current policies on indigenisation.

"By 2030, India will be a different country to what it is now. Our GDP can be around US $7-8 trillion, and we should be a net exporter in defence equipment by then," Kalyani said during a press conference on the 'Punyabhushan Puraskar' by the Punyabhushan Foundation, which was announced in 2020, but will be awarded to Kalyani at a ceremony on Saturday.

He added, "However, there are significant challenges, the biggest one of which is climate change. We have to be able to figure out how to achieve net zero in carbon emissions. Related to that is the challenge of reducing energy consumption, which has to be achieved via creating a circular economy, and the increased use of renewables."



> By 2030, India will be a different country to what it is now. Our GDP can be around US $7-8 trillion, and we should be a net exporter in defence equipment by then. However, there are significant challenges, the biggest one of which is climate change
>
> **Baba Kalyani** | INDUSTRIALIST

"I believe that internal combustion engines will disappear within 30-40 years. We have been investing in electric mobility and green hydrogen production. We have also invested in e-mobility firm Tork, and producing electric powertrains for three wheelers," he said.

Kalyani's Bharat Forge now has significant interests in the Indian defence manufacturing sector, producing artillery, armoured vehicles and tech-based defence systems.

The group has also been transforming away from forges to a full original equipment manufacturer (OEM), with upcoming investments and R&D into defence and electric mobility, among other segments.

ADFACTORS PR
Knowledge-driven communications

| Headline: Gadkari: Econationalism required to trim imports | Publication : Times of India |
|---|---|
| Date : June 5, 2022 | Journalist: |

# Gadkari: 'Eco nationalism' required to trim imports

Shiladitya.Pandit
@timesgroup.com

Sadanand Godse



Dr Baba Kalyani, the CMD of Bharat Forge (centre), recieves the 32nd Punyabhushan award from Nitin Gadkari in Pune on Saturday

**Pune:** Union road transport and highways minister Nitin Gadkari on Saturday said India needed more "economic nationalism" to reduce its dependence on imports.

He was speaking at the Punyabhushan Puraskar ceremony to honour industrialist Baba Kalyani, the ceremony for which was held at the Balgandharva Rangmandir on Saturday evening.

The event was attended by leaders across political spectrum, such as Pune MP Girish Bapat, former cabinet minister Prakash Javadekar and Satara MP Shriniwas Patil, among other people. Cricket legend Chandu Borde, himself an honouree of the Punyabhushan Puraskar, also attended the programme.

"We need to double our efforts to become self-reliant, as per the message of Prime Minister Narendra Modi. That way, we probably need a hundred Baba Kalyanis in India. We still have to develop skills in entrepreneurship and enterprises over the next few years. More economic nationalism is needed to increase exports and reduce imports," the Union minister said.

"Baba Kalyani is a proponent of the economic nationalism we need. We have the raw material and manpower that we need to succeed," he said, while speaking about upcoming road projects in Maharashtra, such as the Pune-Bengaluru Expressway, which "would dramatically cut travel time between the two cities".

In his address, Kalyani praised Gadkari's "can-do attitude", while calling him the soul of Atmanirbhar Bharat initiatives.

"We have developed talent and technology in India. Right now, there are a number of adverse effects of the Russia-Ukraine conflict, such as increasing prices of raw material. It will take some time for the economy to recover from that. But I believe that India will be among the top three countries in the global economy in the future," Kalyani said.

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Saamana |
|---|---|
| Date : June 3, 2022 | Journalist: |

# आत्मनिर्भरतेमुळे हिंदुस्थानची वेगाने प्रगती

पुणे, दि. २ (प्रतिनिधी) – आत्मनिर्भर संकल्पनेतून हिंदुस्थान प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. विशेषत: स्टार्टअप योजना, स्वच्छ भारतसारख्या उपक्रमांमुळे देशांतर्गत विकासात्मक बदल दिसून येत आहेत. त्याशिवाय देशाची तांत्रिकदृष्ट्या क्षमता वाढल्यामुळे आर्थिक प्रगती वेगाने होत असून, आगामी २०३० सालापर्यंत देश आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल, असा विश्वास प्रसिद्ध उद्योगपती बाबा कल्याणी यांनी व्यक्त केला आहे.

पुण्यभूषण फाउंडेशनच्या वतीने यंदाचा पुण्यभूषण पुरस्कार त्यांना जाहीर करण्यात आला आहे. त्या पार्श्वभूमीवर मुंढव्यात आयोजित वार्तालाप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई उपस्थित होते.

बाबा कल्याणी म्हणाले, 'ब्रिटिशांनी देश सोडण्यापूर्वी १४ ते १५ संरक्षण हत्यारे बनविणारे कारखाने तयार केले होते. प्रत्यक्षात मात्र त्यामध्ये आपण वाढ करू शकलो नाही. दरम्यान, चीन आणि गलवान खोऱ्यात अचानकपणे युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खंबीरपणे उत्तर दिले. दुसरीकडे हिंदुस्थानच्या संरक्षण विभागातील धोरणांमध्ये मोठे बदल केल्यामुळे आत्मनिर्भर हिंदुस्थान संकल्पनेतून स्वदेशीसाठी वाव निर्माण झाला आहे. त्याशिवाय आम्ही तयार केलेली स्वदेशी शस्त्रास्त्रे फायदेशीर ठरत आहेत. लष्करासाठी कल्याणी एम-४ हे वाहन तयार करून



खडतर रस्त्यावरील वाहतुकीला पर्याय दिला आहे.

अमेरिकेसारख्या प्रगत देशांपेक्षाही हिंदुस्थानात डिजिटल क्रांतीचे वारे वेगाने वाहत आहे. त्यामुळे २०३० सालापर्यंत इतर देशांच्या तुलनेत आर्थिकदृष्ट्या सक्षम होणार असल्याचे भाकीत त्यांनी वर्तविले. दरम्यान, कोरोना कालावधीतही देशातील नागरिकांनी एकात्मतेची भावना निर्माण केली होती. अशीच एकता प्रत्येक देशवासीयांनी आत्मनिर्भर हिंदुस्थानाबद्दल दाखवून दिली पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## महिन्याभरात इलेक्ट्रिक दुचाकी आणणार

■ भारत फोर्ज कंपनीकडून इलेक्ट्रिक दुचाकी तयार करण्यात येत आहे. या महिन्यातच दुचाकी रस्त्यावर आणणार आहे. त्याशिवाय इलेक्ट्रिक ट्रकची निर्मिती करण्यात येत आहे. लवकरच इलेक्ट्रिक वाहने रस्त्यावर आणणार असल्याचे बाबा कल्याणी यांनी सांगितले.

## पुण्यभूषण पुरस्कार स्वीकारणे अभिमानास्पद

■ मी पुण्याचा रहिवासी असल्यामुळे पुण्यभूषण पुरस्कार स्वीकारणे माझ्यासाठी अभिमानास्पद आहे. पुणे हे विचारवंताचे शहर असून, व्यावसायिकांचे माहेरघर आहे. शहरात टेक्नोसॅव्ही उद्योजक असून, सुमारे २०० ते ३०० वर्षांपासून लोक इथे राहात आहेत. मागील काही वर्षांपासून बिहार, उत्तर प्रदेशमधील विद्यार्थी शिक्षणासाठी येथे येत असल्याचे पाहून अभिमान वाटतो. पुण्याची लोकसंख्या वेगाने वाढतेय; मात्र प्रशासनावर सोयी-सुविधा पुरविण्याचा ताण वाढला आहे. विशेषत: रिंगरोड, विमानतळ प्रश्नांबाबत बाबा कल्याणी यांनी भाष्य केले.

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Saamana |
|---|---|
| Date : June 5, 2022 | Journalist: |



उद्योगपती बाबा कल्याणी यांना नितीन गडकरी यांच्या हस्ते 'पुण्यभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. सतीश देसाई, डॉ. रघुनाश माशेलकर, प्रकाश जावडेकर, गिरीश बापट, श्रीनिवास पाटील, डॉ. शां. ब. मुजुमदार, प्रतापराव पवार, चंदू बोर्डे उपस्थित होते.

# उद्यमशीलतेला चालना दिल्यास आत्मनिर्भरतेचे स्वप्न पूर्ण होईल

पुणे, दि. ४ (प्रतिनिधी) - शिक्षणाचे माहेरघर, सांस्कृतिक राजधानी, आयटी हब ही जशी पुण्याची ओळख आहे. तसेच येत्या काळात पुणे हे 'मॅन्युफॅक्चरिंग हब' म्हणून जगाच्या नकाशावर असेल. रिंगरोडच्या माध्यमातून पुणे इतर औद्योगिक शहरांशी जोडण्यास मदत होईल. कल्पक तरुण ही आपली ताकद असून, त्यांच्यातील उद्योगशीलता आणि उद्यमशीलतेला चालना दिल्यास आत्मनिर्भरतेचे स्वप्न पूर्ण होईल, असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

पुण्यभूषण फाउंडेशनतर्फे उद्योग क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल प्रसिद्ध उद्योगपती बाबा कल्याणी यांना ३२वा पुण्यभूषण पुरस्कार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई, खासदार गिरीश बापट, माजी क्रिकेटपटू चंदू बोर्डे, प्रकाश जावडेकर, डॉ. शां. ब. मुजुमदार, खासदार श्रीनिवास पाटील, गजेंद्र पवार, डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रतापराव पवार उपस्थित होते. ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक आणि सीमेवर लढताना अपंग झालेल्या जवानांचादेखील यावेळी गौरव करण्यात आला. नाईक-धरमवीर सिंग, सुरेश कुमार कर्की, शिपाई - के. नागी रेड्डी, हौसाबाई पाटील, माधवराव माने यांचा मंत्री गडकरी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

नितीन गडकरी म्हणाले, 'पुण्यात अनेक शैक्षणिक संस्था आहेत, त्या संस्थांनी तरुणांमध्ये उद्योगशीलता आणि उद्यमशीलता निर्माण होईल, असे अभ्यासक्रम राबविणे आवश्यक आहे.'


बाबा कल्याणी म्हणाले, 'भविष्यात आत्मनिर्भर हिंदुस्थान डिजिटलायजेशनची क्रांती घडवेल. प्रत्येक हिंदुस्थानीने पुढे येऊन देशाच्या प्रगतीत आपण काय योगदान देऊ शकतो, याचा विचार केला पाहिजे आणि तसे योगदान दिले पाहिजे. २०३० सालापर्यंत हिंदुस्थान एक सशक्त आर्थिक ताकद म्हणून उभा राहील.'

डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष या नात्याने भूमिका विशद केली. यावेळी गिरीश बापट, प्रतापराव पवार, श्रीनिवास पाटील, प्रकाश जावडेकर यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. सतीश देसाई यांनी प्रास्ताविक केले. काका धर्मावत यांनी आभार मानले.

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Loksatta |
|---|---|
| Date : June 3, 2022 | Journalist: |

# भारत आठ वर्षांत संरक्षण उत्पादन क्षेत्रात निर्यातदार

## ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी यांचा विश्वास



**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** येत्या आठ वर्षांत म्हणजे २०३० पर्यंत भारत आर्थिकदृष्ट्या सक्षम औद्योगिक राष्ट्र आणि संरक्षण उत्पादन क्षेत्रात सर्वांत मोठा निर्यातदार म्हणून उदयास येईल, असा विश्वास ज्येष्ठ उद्योगपती आणि भारत फोर्जचे अध्यक्ष व

### पायाभूत सुविधा हव्यात

शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुण्यामध्ये किर्लोस्कर यांनी उद्योगाची मुहूर्तमेढ रोवली. तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यामुळे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकासामध्ये योगदान देत आहेत. त्यांच्याशिवाय मोठे उद्योग तरू शकत नाहीत, याकडे लक्ष वेधून बाबा कल्याणी यांनी पायाभूत सुविधा हव्यात, अशी टिपणी केली. पुण्यातील रस्ते तेवढेच आहेत. पण, लोकसंख्येमध्ये वाढ झाली. वर्तुळाकार रस्ता (रिंग रोड) होणार हे मी गेल्या २५ वर्षांपासून ऐकतो आहे. जगभरात सगळीकडे नदीकाठचे रस्ते विकसित झाले. आपल्याकडे नदीकाठचा रस्ता अद्याप पूर्णपणे झालेला नाही. विमानतळाची गोष्ट दूरची आहे, असेही कल्याणी म्हणाले.

अधिक दर गाठला आहे. ही परिस्थिती कायम राहिल्यास जगाला भयंकर आर्थिक परिणाम भोगावे लागतील. त्यामुळे देश स्वयंपूर्ण आणि आर्थिकदृष्ट्या समृद्ध होणे आवश्यक आहे. केवळ उद्योगांनी नव्हे तर

आम्ही पुढाकार घेतला आहे. यासाठी जगातील सर्वांत आधुनिक कारखाना उभारण्यात आला असून त्याद्वारे संपूर्ण भारतीय बनावटीच्या शस्त्रास्त्रांची आणि साहित्याची निर्मिती केली जात आहे. पारंपरिक

> “जागतिक स्तरावर अनेक सन्मान झाले असले, तरी ज्या शहरात लहानाचा मोठा झालो आणि उद्योग विस्तारला, त्या पुणे शहराच्या नावाने पुरस्कार मिळणे ही अभिमानास्पद गोष्ट आहे.
>
> **- बाबा कल्याणी,** ज्येष्ठ उद्योगपती

युद्धाचे स्वरूप बदलत असून सायबरपासून विषाणू युद्धापर्यंत युद्धकौशल्य येऊन ठेपले आहे. रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेले युद्ध हे आपल्या भौगोलिक सीमांपासून दूर असले, तरी त्याचा आर्थिक परिणाम सर्व जगाला भोगावा लागत आहे.

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Loksatta |
|---|---|
| Date : June 5, 2022 | Journalist: |

# आर्थिक राष्ट्रवादाचे बाबा कल्याणी हे प्रतीक

## नितीन गडकरी यांचे गौरवोद्गार : पुण्यभूषण पुरस्कार प्रदान

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : जगभरात हजारो कोटी रुपयांची उत्पादने निर्यात करणारे बाबा कल्याणी हे खऱ्या अर्थाने आर्थिक राष्ट्रवादाचे प्रतीक आहेत, अशा शब्दांत केंद्रीय वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी बाबा कल्याणी यांचा शनिवारी गौरव केला. भारताला आत्मनिर्भर करण्यासाठी सकल राष्ट्रीय उत्पादनातील (जीडीपी) उत्पादन क्षेत्राचा वाटा किमान दुप्पट करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी किमान शंभर बाबा कल्याणी निर्माण झाले पाहिजेत, असेही गडकरी म्हणाले.

पुण्यभूषण फाउंडेशनतर्फे गडकरी यांच्या हस्ते ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी यांना पुण्यभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्याप्रसंगी गडकरी बोलत होते. माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, खासदार गिरीश बापट, श्रीनिवास पाटील, पुण्यभूषण निवड समितीचे अध्यक्ष व ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. शां. ब. मुजुमदार, चंदू बोर्डे, प्रतापराव पवार, फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई आणि गजेंद्र पवार उपस्थित होते. देशाच्या रक्षणासाठी अपंगत्व पत्करलेल्या पाच सैनिकांचा या वेळी सन्मान करण्यात आला.

गडकरी म्हणाले, बाबा कल्याणी यांचा गौरव हा आत्मनिर्भर भारताच्या नेतृत्वाचा सत्कार आहे. आत्मनिर्भर भारत साकारण्यासाठी आयात कमी करून निर्यात वाढविण्याची गरज आहे. त्यासाठी देशातील युवकांना उद्योजकता आणि उद्यमशीलतेचे शिक्षण देण्याची गरज असून बाबा कल्याणी हे त्याचे मूर्तिमंत उदाहरण आहेत. शिक्षणाचे माहेरघर, सांस्कृतिक राजधानी, माहिती तंत्रज्ञानाचे केंद्र ही जशी पुण्याची ओळख आहे त्याचप्रमाणे येत्या काळात पुणे हे उत्पादनाचे केंद्र म्हणून जगाच्या नकाशावर ठळक स्थान पटकावेल. मात्र, हे करताना पुण्याच्या पर्यावरणाचे नुकसान होणार नाही आणि वाहतूक कोंडी होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागेल.

भारत फोर्जमध्ये मी कामाला सुरुवात केली त्याला ५० वर्षे होत असतानाच पुण्यभूषण पुरस्कार मिळणे भाग्याचे आहे, अशी भावना कल्याणी यांनी व्यक्त केली. उदारीकरणानंतर आम्हाला विस्तार करण्याची आणि जागतिक पातळीवर झळकण्याची संधी मिळाली. आता भारत फोर्ज फोर्जिंगमधील जगातील पहिल्या क्रमांकाची कंपनी झाली आहे, असे कल्याणी यांनी सांगितले.

कल्याणी म्हणाले, आयात कमी, निर्यात अधिक म्हणजे आत्मनिर्भर भारत. एखादे उत्पादन आपण आयात करतो याचा अर्थ आपण त्यासाठीची गुणवत्ता, क्षमताही निर्माण करू शकत नाही. गुणवत्ता आणि तंत्रज्ञानाची सांगड घालून भारताची वेगाने प्रगती झाली. करोनाची दोन वर्षे आणि रशिया-युक्रेन युद्धामुळे त्याला खीळ बसत आहे. देशाच्या शताब्दी वर्षात भारत आपल्या तंत्रज्ञानावर जगात दुसऱ्या क्रमांकावर असेल.

जावडेकर, बापट, डॉ. माशेलकर, पवार, पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. देसाई यांनी प्रास्ताविक केले. योगेश देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. काका धर्मावत यांनी आभार मानले.

ADFACTORS PR
Knowledge-driven communications

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Loksatta |
|---|---|
| Date : June 3, 2022 | Journalist: |




पुण्यभूषण फाउंडेशनतर्फे नितीन गडकरी यांच्या हस्ते बाबा कल्याणी यांना पुण्यभूषण पुरस्काराने शनिवारी गौरविण्यात आले. गजेंद्र पवार, डॉ. सतीश देसाई, डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रकाश जावडेकर, श्रीनिवास पाटील, डॉ. शां. ब. मुजुमदार, प्रतापराव पवार आणि चंदू बोर्डे या वेळी उपस्थित होते.

वृत्त...३

| **Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award** | **Publication : Maharashtra Times** |
|---|---|
| Date : June 3, 2022 | Journalist: |

**मटा अँकर** ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी यांची खंत; पायाभूत सुविधांबाबतही नाराजी

# पंचवीस वर्षांपासून रखडला पुण्याचा रिंग रोड

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'पुणे सक्षम औद्योगिक नगरी म्हणून उदयास येत असताना, त्या तुलनेत शहरातील पायाभूत सुविधा विस्तारलेल्या नाहीत. लोकसंख्या वाढत असताना, रस्ते तेवढेच राहिले आहेत. शहराला दोन रिंग रोडची आवश्यकता असताना, पंचवीस वर्षांपासून रिंग रोडचा प्रकल्प रखडला आहे. साधा नदीकाठचा रस्ताही पूर्ण झालेला नाही,' अशी खंत ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी यांनी व्यक्त केली.

'भारत फोर्ज' या जगातील सर्वांत मोठ्या फोर्जिंग कंपनीचे सर्वेसर्वा बाबा कल्याणी यांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्या, शनिवारी (४ जून) 'पुण्यभूषण' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. या निमित्ताने त्यांनी पत्रकारांनी संवाद साधला. या वेळी ते बोलत होते.

'पुण्यातील तंत्रकुशल उद्योजकांमुळे सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग क्षेत्र वेगाने विकसित होत आहे. त्या जोरावर मोठ्या कंपन्या प्रगती करत आहेत. त्यामुळे पुणे सक्षम औद्योगिक शहर म्हणून उदयास येत आहे. मात्र, त्या तुलनेत पायाभूत सुविधा वाढलेल्या नाहीत. पायाभूत सुविधांमुळेच शहराची कार्यक्षमता व उत्पादकता वाढून आर्थिक समृद्धी येते,' असेही त्यांनी नमूद केले.

'भारत २०३० पर्यंत आर्थिकदृष्ट्या सक्षम औद्योगिक राष्ट्र आणि संरक्षण उत्पादन क्षेत्रात सर्वांत मोठा निर्यातदार म्हणून उदयास येईल,' असा विश्वास व्यक्त करून कल्याणी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेचे कौतुक केले. 'पूर्वी केवळ सरकारकडे हात पसरावे लागत होते. मात्र, आता आत्मनिर्भर भारत धोरणामुळे देशाचे मनोबल उंचावले असून, आपण आपल्या ताकदीवर प्रगती साधू शकतो. प्रत्येक भारतीयाने आपापल्या क्षेत्रात देश स्वयंपूर्ण होण्यासाठी योगदान दिले पाहिजे,' असे आवाहनही त्यांनी केले.

येत्या काही वर्षांत पेट्रोल-डिझेल आधारित इंजिनाचा वापर संपुष्टात येणार असून, इलेक्ट्रिक आणि जैव इंधन आधारित इंजिनाचा वापर वाढणार आहे. त्यामुळे आम्हीही इलेक्ट्रिक वाहनांच्या निर्मितीवर भर देत आहे, असेही उद्योगपती बाबा कल्याणी यांनी स्पष्ट केले.



" पुणे शहराला मोठा इतिहास असून, अनेक विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, उद्योजकांनी पुणे औद्योगिक नगरी म्हणून विकसित करण्यात योगदान दिले आहे. आपल्या शहराच्या नावाने पुरस्कार मिळणे माझ्यासाठी अभिमानास्पद व आनंदाची बाब आहे.

– बाबा कल्याणी, ज्येष्ठ उद्योगपती

## 'स्वावलंबी झाले पाहिजे'

'करोना संकट आणि रशिया-युक्रेन युद्धामुळे कच्च्या तेलाची दुपटीने भाववाढ झाली आहे. युक्रेनमधून गव्हाची निर्यात थांबल्याने जगात खाद्यसंकट निर्माण झाले आहे. परिणामी जागतिक अर्थव्यवस्था मंदावली असून, अनेक देशांत महागाईच्या दराने सात-आठ टक्क्यांची पातळी गाठली आहे. त्यामुळे जगाला भयंकर आर्थिक परिणाम भोगावे लागणार आहेत. त्यासाठी देशाने स्वावलंबी व आर्थिकदृष्ट्या समृद्ध होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत,' असे आवाहनही बाबा कल्याणी यांनी केले.

| **Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award** | **Publication : Maharashtra Times** |
|---|---|
| Date : June 5, 2022 | Journalist: |



ज्येष्ठ उद्योगपती डॉ. बाबा कल्याणी यांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते पुण्यभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या वेळी (डावीकडून) डॉ. सतीश देसाई, डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रकाश जावडेकर, गडकरी, कल्याणी, गिरीश बापट, श्रीनिवास पाटील.

# कल्याणी आर्थिक राष्ट्रवादाचे प्रतीक

## पुण्यभूषण पुरस्काराप्रसंगी गडकरींचे गौरवोद्गार

> “स्वातंत्र्याच्या शताब्दीत भारत स्वबळावर जगातील पहिल्या तीन क्रमांकाच्या देशांमध्ये असेल, याची मला खात्री आहे.
>
> – बाबा कल्याणी, ज्येष्ठ उद्योगपती

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'जगभर हजारो कोटी रुपयांची उत्पादने निर्यात करणारे बाबा कल्याणी हे खऱ्या अर्थाने आर्थिक राष्ट्रवादाचे प्रतीक आहेत. भारताला आत्मनिर्भर करायचे असेल, तर सकल राष्ट्रीय उत्पादनातील (जीडीपी) उत्पादन क्षेत्राचा वाटा किमान दुप्पट करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी शंभर बाबा कल्याणी निर्माण झाले पाहिजेत,' असे मत केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी रविवारी व्यक्त केले.

पुण्यभूषण फाउंडेशनतर्फे ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी यांना गडकरी यांच्या हस्ते ३२व्या पुण्यभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी खासदार गिरीश बापट, माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, खासदार श्रीनिवास पाटील, पुण्यभूषण निवड समितीचे अध्यक्ष ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. शां. ब. मुजुमदार, चंदू बोर्डे, प्रतापराव पवार, पुण्यभूषण फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई, गजेंद्र पवार उपस्थित होते. सैन्यात कर्तव्य बजावताना अपंगत्व आलेल्या पाच जवानांचाही या वेळी सत्कार करण्यात आला.

'बाबा कल्याणी यांचा सत्कार हा आत्मनिर्भर भारताच्या नेतृत्वाचा सत्कार आहे,' असे सांगून गडकरी म्हणाले, 'आत्मनिर्भर भारत साकारण्यासाठी आयात कमी करून निर्यात वाढवावी लागेल. देशातील युवकांना उद्योजकतेचे शिक्षण देण्याची गरज असून, बाबा कल्याणी यांचे चरित्र हे त्याचे उदाहरण आहे. पुणे मॅन्युफॅक्चरिंग हब म्हणून जगात पुढे येईल. मात्र, पुण्याच्या पर्यावरणाचे नुकसान होणार नाही आणि वाहतूककोंडी होणार नाही याकडे लक्ष द्यावे लागेल.'

जावडेकर, बापट, डॉ. माशेलकर, पवार, पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले. डॉ. सतीश देसाई यांनी प्रास्ताविक केले.

### 'कच्च्या मालासाठी भंगार भारतात आणणार'

'स्टील, तांबे, ॲल्युमिनियमच्या किमती प्रचंड वाढल्या आहेत. बहुसंख्य उद्योगांसाठी हाच कच्चा माल आहे. त्यामुळे जगभरातील भंगार भारतात आणून त्यातून हे धातू मिळविण्याचा माझा प्रयत्न आहे. यामुळे सुमारे ३० टक्के कमी दरात हे धातू उपलब्ध होतील,' असे गडकरी यांनी सांगितले.



## बाबा कल्याणींना 'पुण्यभूषण' प्रदान

➤ सविस्तर वृत्त...२

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Pudhari |
|---|---|
| Date : June 3, 2022 | Journalist: |

# आत्मनिर्भर भारतासाठी नवकल्पना आवश्यक

**भारत फोर्जचे अध्यक्ष बाबा कल्याणी यांचे प्रतिपादन**

**पुणे :** 'देशाचे उत्पादन क्षेत्र आत्मनिर्भर बनण्यासाठी तंत्रज्ञान-सक्षम नवकल्पना आवश्यक आहे,' असे भारत फोर्ज कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक बाबा कल्याणी यांनी स्पष्ट केले.

बाबा कल्याणी यांना पुण्यभूषण पुरस्कार जाहीर झाल्यानिमित्त त्यांच्याशी मुंढवा येथील भारत फोर्ज कंपनीत पत्रकारांचा विशेष संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते.

'उद्योग क्षेत्रात आज तंत्रज्ञान सक्षम स्टार्टअपचे प्रमाण वाढत आहे. मेक इन इंडिया अंतर्गत आज देशातील अंदाजे ६८ युनिकॉर्न्सनी २५ लाख कोटींच्या उलाढालीचा टप्पा पार केला आहे. त्यांना प्रोत्साहन, पाठबळ मिळावे यासाठी पंतप्रधान मोदींनी अनेक उद्योग स्नेही धोरणे राबवली आहेत. आजमितीला भारतात येणाऱ्या स्टार्टअप कंपन्या या फिनटेक तंत्रज्ञानावर आधारित आहेत. पण आगामी काळ हा प्रामुख्याने डीपटेक तंत्रज्ञानाचा असणार आहे. यात क्वान्टम कम्प्युटिंग, ड्रोन, एआयचा समावेश असणार आहे,' असे ते म्हणाले.

आर्टलरी गन हे संरक्षणाचे महत्त्वाचे आयुध असून टँक्स, रॉकेटसह आर्टलरी गनचे उत्पादन करण्यास आम्ही पुढाकार घेतला आहे. यासाठी जगातील सर्वात आधुनिक प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पाद्वारे संपूर्ण भारतीय बनावटीच्या शस्त्रास्त्रांची आणि साहित्याची निर्मिती आम्ही करीत आहोत. देशाला या क्षेत्रात आत्मनिर्भरतेची गरज असल्याचा कल्याणी यांनी पुनरुच्चार केला.

'जागतिक पातळीवर शस्त्रास्त्र निर्यातीतही भारत पुढील दशकभरात चांगली कामगिरी करेल,' असे सांगताना बाबा कल्याणी म्हणाले की, पुढील काही वर्षात भारताची अर्थव्यवस्था ही अधिक सक्षम असणार आहे. जागतिक पातळीवर भारताची अर्थव्यवस्था ७ ते ८ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहचण्याची शक्यता आहे. याच काळात शस्त्रास्त्र निर्यातीतही भारताचा वाटा मोठा असेल.



'भारताच्या आत्मनिर्भरतेचे स्वप्न आवाक्यात आहे. मात्र भारतीय उद्योगांना पर्यावरणातील बदल आणि उत्पादित वस्तूंचा पुर्नवापर (सेक्युलर इकोनॉमी) करण्याच्या आव्हानांना सामोरं जावं लागणार आहे. सध्या सगळीकडे उर्जेचा वापर प्रत्येक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. परिणामी, कार्बन उर्जनामुळे पर्यावरण संतुलनात बिघाड होत आहे. त्यात सुधारणा करण्याची जबाबदारी प्रत्येक भारतीयाची आहे. अशावेळी नवीकरणीय उर्जेचा अधिकाधिक वापर फायदेशीर ठरणार आहे,' असेही ते म्हणाले.

'भारत हा कृषीप्रधान देश आहे. इथे गाई, म्हशींची लोकसंख्याही मुबलक आहे. त्यांच्या शेणाचा वापर करून मिथेन निर्मिती करणे शक्य आहे. त्यासाठी तंत्रज्ञानाचा योग्य वापर करुन शेणाचा पुर्नवापर करण्यावर भर दिला पाहिजे,' असेही ते म्हणाले.

'इलेक्ट्रिक व्हेईकलच्या क्षेत्रात भारत फोर्ज कंपनी भरीव काम करत आहे. त्यामुळे इलेक्ट्रीक, हायड्रो इंजिन उत्पादनासाठी येथे मोठ्या प्रमाणात काम केले जाते. पुढील ३० वर्षांच्या कालावधीत कार्बन उत्सर्जित करणारे आयसीए इंजिन्स बाद होतील, असे सुतोवाच बाबा कल्याणी यांनी केले. पर्यायी इंधन क्षेत्रात तीन चाकीसह इलेक्ट्रिक ट्रक लवकरच बाजारात दाखल होणार आहेत. त्यासाठी पुण्यातील स्टार्टअप कंपनीसोबत करार केला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील तंत्रज्ञान भारतात आणण्यासाठी भारत फोर्जने अमेरिकेत दोन टेक सेंटर्स उभे केले आहेत,' असे त्यांनी सांगितले.

> **पुण्यभूषण पुरस्कार मिळणे ही पुण्याईच**
>
> पुण्यात शैक्षणिक, तंत्रज्ञान, सांस्कृतिक अशा सर्व पातळ्यांवर बुद्धिमानी लोकांची फळी कायम सज्ज असते. इथली लोकं बौद्धिक संपन्न असून उद्योगांचा विचार करतात. ही पुण्याची परंपरा ब्रिटिशांच्या काळापासून आहे. याचा दाखला देताना १८८१ सालच्या न्यू इंग्लिश स्कूलचे तत्कालीन मुख्याध्यापक कुंटे यांनी आपल्या भाषणात भारतीयांना लोहारकाम शिकण्याचा सल्ला दिला होता. कारण त्या वेळी ब्रिटिशांच्या हातात बंदुका होत्या, तर भारतीयांच्या हातात निव्वळ तलवारी होत्या. त्यामुळे अशा सर्वसंपन्न पुण्यात पुण्यभूषण पुरस्कार मिळणे, ही माझी पुण्याईच आहे.
>
> **- बाबा कल्याणी,**
> सीएमडी, भारत फोर्ज

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Pudhari |
|---|---|
| Date : June 5, 2022 | Journalist: |

# पुणे देशासाठी दिशादर्शक

## नितीन गडकरी यांचे मत; उद्योजक बाबा कल्याणी यांना 'पुण्यभूषण'

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**'पुण्याने देशाला दिशा दिली आहे. देशात उत्पादनक्षमतेत वाढ करून आयात कमी करून निर्यात वाढविण्याचे जे ध्येय्य आहे, त्याचा अवलंब जर पुण्यात झाला, तर देशात तो सुरू व्हायला वेळ लागणार नाही. यामध्येही पुण्याने दिशादर्शक व्हावे,' अशी अपेक्षा रस्ते परिवहन व राजमार्ग केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली.**



**उद्योजक बाबा कल्याणी यांचा पुण्यभूषण फाउंडेशनच्या वतीने ३२ वा पुण्यभूषण पुरस्कार देऊन नितीन गडकरी यांच्या हस्ते शनिवारी सन्मान करण्यात आला. या वेळी उपस्थित मान्यवर.**

पुण्यभूषण फाउंडेशनच्या वतीने ३२ वा 'पुण्यभूषण' पुरस्कार उद्योजक बाबा कल्याणी यांना देण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी गडकरी बोलत होते.

या वेळी पुण्यभूषण समितीचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर, खासदार गिरीश बापट, खासदार श्रीनिवास पाटील, माजी मंत्री प्रकाश जावडेकर, सिम्बायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार आदी उपस्थित होते.

गडकरी म्हणाले, 'देशाच्या विकासदरात कृषी क्षेत्राचे योगदान १२ ते १४ टक्के आहे. उत्पादन क्षेत्राचे २२ ते २४ टक्के आहे आणि सेवा क्षेत्राचे ५२ ते ५६ टक्के आहे. त्यामुळे देशाला आत्मनिर्भर बनवायचे असेल, तर उत्पादन क्षेत्राचे जे योगदान आहे ते दुप्पट करणे गरजेचे आहे. शिक्षणात उद्योजकता आणि उद्यमशीलतेचा अभाव आहे. त्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.' 'पुण्यात प्रदूषण आहे, ट्रॅफिक आहे, गर्दी आहे. त्यामुळे जुन्या पुण्याची आठवण सर्वांना येते. मुंबई ते बंगळुरू रस्ता तयार करीत आहे. त्यासाठी पुण्यातील रिंगरोडदेखील आमच्या ताब्यात आहे. पुणे ते बंगळुरूमधील अंतर ११० किलोमीटरने कमी होणार आहे. त्यामुळे हे अंतर तीन ते साडेतीन तासांत पूर्ण करता येणार आहे. त्याचबरोबर पुणे ते औरंगाबाद (संभाजीनगर) हा रस्तादेखील तयार करीत आहे,' असेही ते म्हणाले.

'दोन्ही रस्त्यांसाठी एकूण ६० हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. हे दोन्ही रस्ते पुण्यासाठी खूप उपयोगाचे आहेत. या रस्त्यांच्या बाजूला नवीन पुणे वसवता आले, तर मुख्य पुण्यावरील भार कमी होईल. पुण्याचा विकास आराखडा तयार करून पुणे हे उत्पादनाचे हब आहेच, त्यात आणखी वाढ करावी. त्यासाठी बाबा कल्याणी यांच्यासारख्या उद्योजकांनी दिशा दिली, तर पुणे जगातील महत्वाचे शहर ठरेल,' असेही गडकरी यांनी यावेळी स्पष्ट केले.

सत्काराला उत्तर देताना कल्याणी म्हणाले, 'जगभरातील विविध देशांमध्ये आता कंपन्या स्थापन करीत आहे. देशाने उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्यानंतर काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे आज जगभरातील विविध देशांना वेगवेगळे स्पेअर पार्ट निर्यात करता येत आहेत.'

ते म्हणाले, 'संशोधन आणि गुणवत्ता याची भरभराट या देशात असल्यामुळे देश ज्या वेळी स्वातंत्र्याची शंभरी पार करीत असेल त्या वेळी जगात पहिल्या तीन देशांमध्ये भारताचे नाव घेतले जाईल. उद्योग क्षेत्रात काम करण्याबरोबरच सामाजिक क्षेत्रात देखील काम करीत आहोत. त्यासाठी जवळपास १०० खेडी दत्तक घेतली आहेत.'

### जगात कुठेही जा, पुण्यातील माणूस भेटतो

'अरुणाचल, मेघालय, त्रिपुरा, स्वीडन, मलेशिया, इंडोनिशिया, स्वित्झर्लंड... कुठेही जा हमखास पर्यटक भेटतात आणि त्यातील जास्तीत जास्त पर्यटक पुण्यातील असतात. हे पुण्याचे वैशिष्ट्य आहे. त्याचबरोबर पुण्यात विद्वान लोकांचा तोटा नाही, त्यामुळे कामापेक्षा सल्ले देणारे फार आहेत,' अशी मिश्कील टिप्पणीदेखील गडकरी यांनी केली.

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Kesari |
| --- | --- |
| Date : June 3, 2022 | Journalist: |

# संरक्षण उत्पादन क्षेत्रात भारत सर्वात मोठा निर्यातदार होईल

## बाबा कल्याणी यांचे प्रतिपादन

**पुणे :** भारत येत्या आठ वर्षांत आर्थिकदृष्ट्या सक्षम औद्योगिक राष्ट्र आणि संरक्षण उत्पादन क्षेत्रात सर्वात मोठा निर्यातदार म्हणून उदयास येईल, असा विश्वास ज्येष्ठ उद्योगपती आणि भारत फोर्जचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बाबा कल्याणी यांनी व्यक्त केला. देश स्वावलंबी होण्यासाठी प्रत्येक भारतीयाने आपापल्या क्षेत्रात आत्मनिर्भर भारत मोहिमेला प्रोत्साहन दिले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

जगातील सर्वांत मोठी फोर्जिंग कंपनीचे सर्वेसर्वा बाबा कल्याणी यांना 'पुण्यभूषण' पुरस्कार उद्या (शनिवारी) केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. या निमित्ताने पत्रकारांनी त्यांच्याशी संवाद साधला. या प्रसंगी ते बोलत होते.

'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आत्मनिर्भर भारत संकल्पनेमुळे देशाचे मनोबल उंचावून मोठ्या प्रमाणात प्रगती साधण्यास मदत होईल,' असे आवर्जून नमूद करत बाबा कल्याणी म्हणाले, 'रशिया-युक्रेन युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्था मंदावली असून, अनेक देशांत महागाई दराने आठ टक्क्यांहून अधिक दर गाठला आहे. ही परिस्थिती कायम राहिल्यास जगाला भयंकर आर्थिक परिणाम भोगावे लागतील. त्यामुळे देश स्वयंपूर्ण आणि आर्थिकदृष्ट्या समृद्ध होणे आवश्यक आहे.'

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Kesari |
|---|---|
| Date : June 5, 2022 | Journalist: |

# उद्योग व उद्यमशीलतेच्या बळावर भारत आत्मनिर्भर होईल

## नितीन गडकरी यांचा आशावाद

पुणे : देशातील तरुणांकडे प्रचंड बुद्धिमत्ता व कार्यक्षमता आहे. त्यांची कल्पकता देशाची ताकद आहे. त्यांच्यातील उद्योगशीलता आणि उद्यमशीलतेला चालना दिल्यास भारताचे आत्मनिर्भरतेचे स्वप्न पूर्ण होईल. आत्मनिर्भरतेत आयात हा अडथळा आहे. हा अडथळा दूर करण्यासाठी आयात कमी करून उद्योग क्षेत्राने निर्यात वाढविली पाहिजे. तरच आत्मनिर्भरतेचे स्वप्न लवकरात लवकर वास्तवात येईल. असा आशावाद केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी व्यक्त केला.

पुण्यभूषण फाउंडेशनतर्फे ३२ वा पुण्यभूषण पुरस्कार केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी यांना प्रदान करण्यात आला. त्यावेळी गडकरी बोलत होते. यावेळी पुण्यभूषण पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर, खासदार श्रीनिवास पाटील, गिरीश बापट, माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, डॉ. शा. बं. मुजुमदार, चंदू बोर्डे, प्रतापराव पवार, डॉ. सतीश देसाई आदी उपस्थित होते.



बाबा कल्याणी यांना नितीन गडकरी यांच्या हस्ते पुण्यभूषण पुरस्कार शनिवारी प्रदान करण्यात आला. यावेळी (डावीकडून) डॉ. रघुनाश माशेलकर, प्रकाश जावडेकर, गिरीश बापट, श्रीनिवास पाटील, डॉ. शां. ब. मुजुमदार आदी.

गडकरी म्हणाले, देशाच्या विकासात वाहन निर्मिती क्षेत्राचे योगदान मोलाचे आहे. सर्वच क्षेत्रात पुण्याने देशाला दिशा दिली आहे. निर्यात वाढीतही पुण्याने देशाला दिशा दाखवावी. त्यासाठी बाबा कल्याणी सारख्या अनुभवी व्यक्तींनी पुढाकार घेऊन आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण करावे. पुणे हे उत्पादन हब म्हणून जगाच्या नकाशावर उभारेल. आयात करणारा नव्हे, तर निर्यात करणारा देश अशी भारताची ओळख निर्माण होईल. रिंगरोडच्या माध्यमातून शहर इतर औद्योगिक शहरांशी जोडण्यास मदत होईल. पुण्यात अनेक शैक्षणिक संस्था आहेत, त्या संस्थांनी तरूणांमध्ये उद्योगशीलता आणि उद्यमशीलता निर्माण होईल, असे अभ्यासक्रम राबविणे आवश्यक आहे. डॉ. रघुनाथ माशेलकर, श्रीनिवास पाटील, गिरश बापट, प्रकाश जावडेकर, प्रतापराव पवार, डॉ. सतीश देसाई आदींनी मनोगत व्यक्त केले. योगेश देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

### वसंत व्याख्यानमाला पुण्याचे वैभव

१४८ वर्षापूर्वी सुरू झालेल्या वसंत व्याख्यानमेचा ज्ञानयज्ञ आजही अविरत सुरू आहे. ३० मे १८८४ रोजी इंग्रजी शाळेचे मुख्याध्यापक एम. एम. कुंटे यांनी व्याख्यानमालेत केलेल्या भाषणात उद्योगाचे महत्त्व सांगितले होते. असा उल्लेख असलेले पुस्तक मला अमेरिकेत वाचायला मिळाले. पुस्तकातील वर्णनावरून व्याख्यानमालेच्या वैभवाची प्रचीती येते. एखादी गोष्टी इतकी दीर्घकाळ टिकू शकते. याचे उदाहरण म्हणजे वसंत व्याख्यानमाला आहे. अशा शब्दांत वसंत व्याख्यानमालेचे ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी यांनी कौतुक केले.

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Punyagiri |
| --- | --- |
| Date : June 3, 2022 | Journalist: |

# आत्मनिर्भर भारत आणि डिजिटलायजेशन क्रांती घडवेल

**बाबा कल्याणी**

**पुण्यभूषण फाउंडेशनतर्फे ३२ वा पुण्यभूषण पुरस्कार ४ जून रोजी करणार प्रदान**

**पुणे** : अमेरिका आणि चीननंतर भारताचा स्टार्टअपच्या क्षेत्रात तिसरा क्रमांक लागत असून हा क्रमांक भारताचे वेगाने होणारे डिजिटलायजेशन अधोरेखित करते. भविष्यात आत्मनिर्भर भारत आणि डिजिटलायजेशन भारतात क्रांती घडवेल, असा विश्वास ज्येष्ठ उद्योजक बाबा कल्याणी यांनी व्यक्त केला.



पुण्यभूषण फाउंडेशनतर्फे ३२ वा पुण्यभूषण पुरस्कार ४ जून रोजी बाबा कल्याणी यांना प्रदान करण्यात येणार आहे. यानिमित्त त्यांच्याशी भारत फोर्ज कंपनीत पत्रकारांचा विशेष संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी पुण्यभूषण फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई उपस्थित होते.

या वेळी बाबा कल्याणी म्हणाले की, प्रत्येक भारतीयाने पुढे येऊन भारताच्या प्रगतीत आपण काय योगदान देऊ शकतो, याचा विचार केला पाहिजे आणि तसे योगदान दिले पाहिजे. कोरोना काळात आत्मनिर्भर भारत या धोरणामुळेच पीपीई किटपासून लसीकरणापर्यंत आपण आपली आत्मनिर्भरता सिद्ध केली.

देश स्वतंत्र होऊन अनेक वर्षे लोटली. ब्रिटिशांनी त्यांच्या कार्यकाळात उभारलेल्या शस्त्रनिर्मिती कारखान्याच्या जोरावरच पारंपरिक पद्धतीने शस्त्रनिर्मिती आणि शस्त्र सिद्धता दाखवत होतो. टँक्स, रॉकेटसह आर्टिलरी गनचे उत्पादन करण्यास आम्ही पुढाकार घेतला आहे. यासाठी जगातील सर्वांत आधुनिक प्लान्ट उभारण्यात आला आहे. या प्लान्टद्वारे संपूर्ण भारतीय बनावटीच्या शस्त्रास्त्रांची आणि साहित्याची निर्मिती आम्ही करीत आहोत. रशिया आणि युक्रेनमध्ये चालू असलेले युद्ध हे आपल्या भौगोलिक सीमांपासून दूर असले तरी त्याचा आर्थिक परिणाम सर्व जगाला भोगावा लागत आहे. २०३० सालापर्यंत भारत एक सशक्त आर्थिक ताकद म्हणून उभा राहील.

शस्त्रास्त्र निर्मिती क्षेत्रात पाश्चात्त्य देशांतील कोणत्याही मोठ्या कंपनीसोबत जॉइंट व्हेन्चर किंवा भागीदारी असे कोणतेही पर्याय निवडले तरी त्यांच्यावर अवलंबून राहता येत नाही.

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Aaj Ka Anand |
|---|---|
| Date : June 3, 2022 | Journalist: |

# आत्मनिर्भर भारत और डिजिटलाइजेशन से देश में क्रांति : बाबा कल्याणी

## भारत फोर्ज में आयोजित विशेष कार्यक्रम में वरिष्ठ उद्योगपति ने कहा- 2030 तक देश एक सशक्त आर्थिक ताकत बनेगा

मुंढवा, 3 जून
(आज का आनंद न्यूज नेटवर्क)

अमेरिका और चीन के बाद भारत का स्टार्ट-अप क्षेत्र में तीसरा स्थान है. यह स्थान भारत के तेज गति से होने वाले डिजिटलाइजेशन को दर्शाता है. भविष्य में आत्मनिर्भर भारत और डिजिटलाइजेशन से भारत में क्रांति होगी. यह विश्वास वरिष्ठ उद्योगपति और पद्मभूषण बाबा कल्याणी ने व्यक्त किया है. पुण्यभूषण फाउंडेशन की ओर से 32वां 'पुण्यभूषण' पुरस्कार शनिवार (4 जून) को बाबा कल्याणी को प्रदान किया जाएगा. इस अवसर पर मुंढवा स्थित भारत फोर्ज कंपनी में आयोजित विशेष कार्यक्रम में वे बोल रहे थे. इस अवसर पर पुण्यभूषण फाउंडेशन के अध्यक्ष डॉ. सतीश देसाई उपस्थित थे.



बाबा कल्याणी
वरिष्ठ उद्योगपति और पद्मभूषण

बाबा कल्याणी ने कहा कि केंद्रीय स्तर पर नीतियों में विशेष बदलाव किए गये हैं. स्वच्छ भारत, स्मार्ट सिटी और आत्मनिर्भर भारत नीतियों के चलते उद्यमियों में नवचेतना जगी है. इससे छोटे व्यापारियों को प्रेरणा मिली है. उन्होंने विश्वास व्यक्त करते हुए कहा कि वर्ष 2030 तक भारत एक सशक्त आर्थिक ताकत वाले देश के रूप में उभरकर सामने आएगा.

वरिष्ठ उद्योगपति ने कहा कि हर एक भारतीय को आगे आकर भारत के विकास में क्या योगदान देना है? इस पर विचार करना चाहिए और अपना योगदान देना चाहिए. बाबा कल्याणी ने कहा कि कोरोना के दौरान आत्मनिर्भर भारत नीति के चलते ही पीपीई किट से लेकर वैक्सीनेशन तक में हमने अपनी निर्भरता साबित की है. ब्रिटिश कार्यकाल के दौरान बनाए गए शस्त्र निर्माण कारखाने के दम पर ही पारंपारिक तरीके से शस्त्र निर्माण किया जा रहा था. इस निर्माण में विकास नहीं हो रहा था. वर्ष 1984 में बोफोर्स कंपनी ने अपनी तकनीक ट्रांसफर अंतर्गत अपनी सभी तकनीकी जानकारी सहित 10 ट्रक सामान सरकार को दिया. इसके बावजूद उस तकनीकी का हमने इस्तेमाल नहीं किया है.

### विश्व के सबसे आधुनिक प्लांट का निर्माण

वरिष्ठ उद्योगपति और पद्मभूषण बाबा कल्याणी ने कहा कि आर्टिलरी गन रक्षा क्षेत्र में महत्वपूर्ण हथियार है. टैंक, रॉकेट सहित आर्टिलरी गन का उत्पादन करने के क्षेत्र में हमने नेतृत्व किया है. इसके लिए विश्व का सबसे आधुनिक प्लांट बनाया गया है. इस प्लांट द्वारा संपूर्ण भारतीय बनावट के हथियारों एवं उपकरणों का निर्माण हम कर रहे हैं. शस्त्र निर्माण क्षेत्र में पाश्चात्य देश की किसी भी बडी कंपनी के साथ ज्वाइंट वेंचर या भागीदारी में से कोई भी विकल्प चुनने पर उन पर निर्भर नहीं रह सकते.

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Aaj Ka Anand |
|---|---|
| Date : June 5, 2022 | Journalist: |

# उद्यमिता के बल पर आत्मनिर्भर बनेगा भारत

## बाबा कल्याणी को पुण्य भूषण पुरस्कार से सम्मानित करते हुए नितिन गड़करी ने कहा

- बोले- देश के प्रतिभावन युवा हमारी ताकत, बाबा कल्याणी ने पुणे का नाम पूरी दुनिया में रोशन किया
- पुणे मैन्यूफैक्चरिंग हब के रूप में विश्व में प्रसिद्ध होगा



बालगंधर्व रंग मंदिर में आयोजित पुण्यभूषण पुरस्कार समारोह के अवसर पर उपस्थित (बाएं से) गजेंद्र पवार, डॉ. सतीश देसाई, डॉ. रघुनाश माशेलकर, प्रकाश जावड़ेकर, नितिन गड़करी, बाबा कल्याणी, गिरीश बापट, श्रीनिवास पाटिल, डॉ. एस. बी. मुजुमदार, प्रतापराव पवार और चंदू बोर्डे.

**शिवाजीनगर, 4 जून**
**(आज का आनंद न्यूज नेटवर्क)**

भारत के प्रतिभावान युवा हमारी ताकत हैं. केंद्रीय मंत्री नितिन गड़करी ने उम्मीद जताई कि भारत का आत्मनिर्भरता का सपना सच होगा यदि उनकी उद्यमशीलता और उद्यमिता को पोषित किया जाएगा. वे 32वें पुण्य भूषण पुरस्कार समारोह में बोल रहे थे.

केंद्रीय मंत्री नितिन गड़करी के हाथों शनिवार को बाबासाहेब नीलकंठ कल्याणी को पुण्य भूषण पुरस्कार से सम्मानित किया गया. बाबा कल्याणी ने उद्योग के क्षेत्र में अपने अमूल्य योगदान से पुणे का नाम दुनिया भर में रोशन किया है. कार्यक्रम में सांसद गिरीश बापट, पूर्व क्रिकेटर चंदू बोर्डे, पूर्व केंद्रीय मंत्री प्रकाश जावड़ेकर, डॉ. एस.बी. मुजुमदार, सांसद श्रीनिवास पाटिल, गजेंद्र पवार, डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रतापराव पवार, संस्था के अध्यक्ष डॉ. सतीश देसाई आदि उपस्थित थे.

नितिन गड़करी ने कहा कि जिस तरह पुणे को शिक्षा का घर, संस्कृति की राजधानी, आईटी हब के रूप में जाना जाता है, उसी तरह निकट भविष्य में पुणे एक मैन्यूफैक्चरिंग हब के रूप में दुनिया के नक्शे पर होगा. पुणे में कई शैक्षणिक संस्थान हैं, उन संस्थानों को ऐसे पाठ्यक्रमों को लागू करने की आवश्यकता है जो युवाओं में उद्यमिता पैदा करें.

बाबा कल्याणी ने कहा कि भविष्य में आत्मनिर्भर भारत और डिजिटलाइजेशन देश में क्रांति लाएगा. क्योंकि अमेरिका और चीन के बाद भारत का स्टार्ट-अप के क्षेत्र में तीसरा स्थान है. प्रत्येक भारतीय को आगे आना चाहिए और यह सोचकर योगदान देना चाहिए कि हम भारत की प्रगति में क्या योगदान दे सकते हैं.

पुरस्कार चयन समिति के अध्यक्ष के रूप में डॉ. रघुनाथ माशेलकर ने अपनी भूमिका स्पष्ट की. गिरीश बापट, प्रतापराव पवार, श्रीनिवास पाटिल, प्रकाश जावड़ेकर ने भी अपने विचार व्यक्त किए. संस्था के अध्यक्ष डॉ. सतीश देसाई ने प्रास्ताविक किया. कार्यक्रम का संचालन योगेश देशपांडे ने किया. काका धर्मावत ने आभार व्यक्त किया.

कार्यक्रम में वरिष्ठ स्वतंत्रता सेनानी और सीमा पर लड़ते हुए घायल और अपंग हुए सैनिकों को सम्मानित किया गया. इसमें नागालैंड के दीमापुर में ड्यूटी पर रहते हुए 1996 में एक खदान विस्फोट में घायल और विकलांग नाइक धरमवीर सिंह, निजी बस और एम्बुलेंस की टक्कर में हुई दुर्घटना में विकलांग हुए नाइक सुरेश कुमार कर्की, ड्यूटी के दौरान वाहन दुर्घटना में हड्डी में चोट और इसके परिणामस्वरूप विकलांग हुए के. नागी रेड्डी, क्रांतिसिंह नाना पाटिल की पोती और विभिन्न स्वतंत्रता संग्रामों में शामिल रहीं श्रीमती हौसाबाई पाटिल (सातारा) तथा 1942 के चले जाओ आंदोलन में प्रमुख भागीदार रहे और अंग्रेजों के लिए सिरदर्द बने सांगली के माधवराव माने को नितिन गड़करी के हाथों सम्मानित किया गया.

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Rashtrasanchar |
|---|---|
| Date : June 3, 2022 | Journalist: |



# तंत्रज्ञानामध्ये देशाला स्वावलंबी होणे अत्यावश्यक

## भारत फोर्जचे बाबा कल्याणी यांचे मत

अनिरुद्ध बडवे

भारत फोर्जचे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर बाबा कल्याणी यांना आज मानाचा पुण्यभूषण पुरस्कार प्रदान होत आहे. यानिमित्ताने त्यांनी दैनिक 'राष्ट्रसंचार'ला दिलेली खास मुलाखत! पश्चिम महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून आलेल्या आणि अभियांत्रिकीची पार्श्वभूमी असलेल्या बाबा कल्याणी यांच्या भारत फोर्ज या कंपनीने अनेक वर्षांच्या अव्याहत मेहनतीने संरक्षण सामग्री, हेवी इंजिनीअरिंग आणि डिजिटल टेक्नॉलॉजीमध्ये सातासमुद्रापार देशाची कीर्ती पोहोचवली आहे.

### भारताचा जीडीपी वाढणार...

### इलेक्ट्रिकल रिव्होल्यूशनची गरज...

### आगामी उद्योग जगतात क्रांती

### लहान कंपन्यांचेही योगदान मोठेच...

### युक्रेन-रशिया युद्धाचे दूरगामी परिणाम...

### पुण्याची संस्कृती उद्योगाला पूरकच...

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Rashtrasanchar |
|---|---|
| Date : June 6, 2022 | Journalist: |

# बाबा कल्याणी हे औद्योगिक राष्ट्रवादाचे प्रतीक : गडकरी

## ३२ व्या पुण्यभूषण पुरस्काराचे थाटात वितरण

राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** त्रिदल-पुणे, पुण्यभूषण फाउंडेशनचा ३२ वा पुण्यभूषण पुरस्कार ज्येष्ठ उद्योजक बाबा कल्याणी यांना केंद्रीय वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते शनिवारी सायंकाळी बालगंधर्व रंगमंदिर येथे झालेल्या शानदार सोहळ्यात देण्यात आला.



यावेळी निवड समितीचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर, माजी केंद्रीयमंत्री प्रकाश जावडेकर, माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, डॉ. शां. ब. मुजुमदार, चंदू बोर्डे, प्रतापराव पवार, पुण्यभूषण फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई, गजेंद्र पवार व्यासपीठावर उपस्थित होते.

सैन्यात काम करताना जायबंदी झालेल्या पाच जवानांचादेखील या कार्यक्रमात सन्मान करण्यात आला. डॉ. सतीश देसाई यांनी प्रास्ताविक केले. योगेश देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. सुरेश धर्मावत यांनी आभार मानले.

गडकरी म्हणाले, "'आत्मनिर्भर भारत' ज्यांच्या नेतृत्वाखाली घडवायचे आहे, त्या नेतृत्वाचा हा सत्कार आहे. पाच ट्रिलियनची अर्थव्यवस्था करण्याचे पंतप्रधानांचे लक्ष्य आहे. आत्मनिर्भर भारत करण्यासाठी औद्योगिक उत्पादन दुप्पट केले पाहिजे. निर्यात वाढवावी लागेल. उद्यमशील कर्तृत्वे सर्वांसमोर आली पाहिजेत. उद्यमशीलता वाढली पाहिजे. औद्योगिक राष्ट्रवाद महत्त्वाचा असून बाबा कल्याणी त्याचे प्रतीक आहेत. इलेक्ट्रिक वाहननिर्मितीमुळे मोठी व्यापारपेठ निर्माण होणार आहे. पुणे-बंगळुरू महामार्गाच्या कामाला सुरुवात होत असून साडेतीन तासाचा हा प्रवास असेल. नवे सॅटेलाइट पुणे या भागात निर्माण केले पाहिजे. ऑटोमोबाईल इंडस्ट्री साडेसात लाख कोटींवर नेण्याचा माझा प्रयत्न आहे. युवा पिढी हुशार असून ती चांगले काम करीत आहे. उद्यमशीलतेला पोषक वातावरण पाहता पुणे जगाच्या नकाशावर आजच्यापेक्षा महत्त्वाचे शहर बनेल.

पुरस्कार, सन्मानाला उत्तर देताना बाबा कल्याणी म्हणाले, 'माझ्या कारकिर्दीला ५० वर्षे होत असताना पुण्यभूषण पुरस्कार मिळत असल्याचा आनंद आहे. पुण्यातील सर्व क्षेत्रांतील पोषक वातावरणामुळे प्रगती झाली, हे विसरता येणार नाही.

> पान ९ वर

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Rashtrasanchar |
|---|---|
| Date : June 6, 2022 | Journalist: |

## बाबा कल्याणी हे औद्योगिक राष्ट्रवादाचे प्रतीक

(पान १ वरून)

उदारीकरण (लिबरलायझेशन) नंतर उद्योगांची प्रगती झाली. निर्यात सुरू झाली. 'भारत फोर्ज'नेही या काळात प्रगती केली. प्रगत देशाच्या तंत्रज्ञानावर आपण थोड्या अधिक मेहनतीने मात करू, हे आमच्या लक्षात आले. नवनवीन उत्पादन सुरू करणे म्हणजे नवनवीन प्रतिभानिर्मिती करणे होय. आत्मनिर्भर भारत संकल्पनेमुळे देशाची प्रगती होणार आहे. भारतीय स्वातंत्र्याला शंभर वर्षे पूर्ण होताना देश जगातील पहिल्या तीन क्रमांकांत असेल. धातूशास्त्र (मेटलर्जी) तंत्रात भारत जगात पुढे होता. ते सांगूनच आम्ही संरक्षण क्षेत्रातील उत्पादन खासगी क्षेत्राला खुले करण्याचा आग्रह सरकारच्या मेक इन इंडिया परिषदेत केला. त्याला परवानगी मिळाल्यानेच आधुनिक तोफानिर्मितीचे लक्ष्य साध्य केले. आत्मनिर्भर भारताचा आत्मा नितीन गडकरी आहेत. रस्ते उभारणीच्या कामाने देशाचे भविष्य उज्ज्वल होणार आहे, असेही कल्याणी म्हणाले. यावेळी खासदार गिरीश बापट, डॉ. माशेलकर, श्रीनिवास पाटील, प्रकाश जावडेकर, प्रतापराव पवार यांनीही मनोगत व्यक्त केले.

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Sakal |
| --- | --- |
| Date : June 3, 2022 | Journalist: |

# आत्मनिर्भरतेच्या धोरणाला पर्याय नाही

**'पुण्यभूषण फाउंडेशन'तर्फे बत्तिसावा पुण्यभूषण पुरस्कार शनिवारी (ता. चार जून) ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी यांना देण्यात येणार आहे. त्यानिमित्त त्यांच्याशी साधलेला संवाद. आत्मनिर्भर भारत, डिजिटायजेशन, स्टार्टअप, सरकारची धोरणे आदी विविध विषयांवर त्यांनी या वेळी विचार मांडले.**

गणाधीश प्रभुदेसाई



**प्रश्न : भारताला अजूनही संरक्षण यंत्रसामग्री आयात का करावी लागते?**

**बाबा कल्याणी :** स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत, तरी आजही आपण संरक्षण यंत्रसामग्री आयात करतो. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या १४-१५ ऑर्डनन्स फॅक्टरी आपल्याकडे होत्या. त्यात देहूरोडला मोठ्या बंदुका बनविणारा कारखाना, खडकीची दारुगोळा फॅक्टरी आदींचा समावेश आहे. त्यानंतर दुर्दैवाने आपण विशेष काही करू शकलो नाही, हे सत्य आहे. १९८४मध्ये स्वीडनकडून बोफोर्स तोफ आयात केली. त्यावेळी त्या कंपनीने बोफोर्सच्या सर्व तांत्रिक माहितीसह १० ट्रक सामान सरकारला दिले. तरीदेखील त्या तंत्रज्ञानाचा आपण उपयोग करून घेतला नाही.

**: आत्मनिर्भर भारताबाबत काय वाटतं?**

: चीन व गलवानचा प्रश्न उपस्थित झाला, तेव्हा वेगळ्या परिस्थितीला अचानक तोंड देण्याची वेळ आपल्यावर आली. देशात खंबीर नेतृत्व होते म्हणून तेव्हा उत्तर देऊ शकलो. आपल्याकडील बरीचशी यंत्रसामग्री ही रशियाकडून आयात केलेली आहे. त्यांच्या सुट्या भागासाठी आपल्याला त्या देशावर अवलंबून राहावे लागते. पण सध्या त्यांच्यावर युक्रेन युद्धामुळे निर्बंध आहेत. त्याचा फटका भारतालाही बसतो आहे. म्हणून 'आत्मनिर्भर भारत' हा एकमेव पर्याय असून सर्व समस्यांना तोंड देण्याचा तो मार्ग आहे. 'आत्मनिर्भर भारत'साठी सरकारकडून ज्या प्रमाणात व ज्या पद्धतीने प्रोत्साहन दिले जात आहे, ते पाहता २०३०नंतर भारतातून विविध संरक्षण सामग्रीची निर्यात होईल.

**: 'राफेल'शी झालेल्या करारासंबंधी काय सांगाल?**

: आतापर्यंत भारत फोर्जने जे केलं आहे, ते सर्व स्वसामर्थ्यावर, स्वतःचं तंत्रज्ञान वापरून केलं आहे. राफेलबरोबर करार झाल्यानंतर त्यात विशेष असं काही झालेलं नाही. पण आपण आपल्या ताकदीवर काही करतो, तेव्हाच आपण विकास करू शकतो. तुम्ही जगात कोणाबरोबरही भागीदारी करा, ते तुम्हाला सगळे तंत्रज्ञान देत नाहीत. महत्त्वाच्या गोष्टी ते हातात राखून ठेवतात. संरक्षण क्षेत्रात तर नाहीच नाही. म्हणून आपण आत्मनिर्भर व्हायलाच हवं. अन्यथा स्वतःची मान अडकवून ठेवल्यासारखं होईल.

**: स्टार्टअप उपक्रम यशस्वी झाला का? पुण्यातील स्टार्टअपची प्रगती कशी वाटते?**

: नक्कीच. स्टार्टअपद्वारे पंतप्रधानांनी तरुणांना एक दिशा दाखविली आहे. स्टार्टअपमध्ये भारत तिसऱ्या क्रमांकावर आहे. सुमारे २५ लाख कोटींची गुंतवणूक यात झाली. पुणे हे प्रगत विचारांचं शहर आहे. येथील सर्व गोष्टी व्यवस्थित मार्गाने चालल्या आहेत. स्टार्टअपबाबतही तसंच आहे. पुणे स्टार्टअपमध्येही योग्य दिशेने चाललं आहे. भारत फोर्जनेही सहा स्टार्टअपना मदत घेतली आहे. लहान उद्योगांशिवाय मोठे उद्योग चालू शकत नाहीत. सर्व काही आम्ही तयार करू शकत नाही. आम्ही लष्करासाठी एक बंदूक तयार केली आहे, त्यासाठी सुमारे ४०० कंपन्यांनी लहान वेगवेगळे घटक तयार केले आहेत. यात पुणे, कोल्हापूरचाही समावेश आहे.

**: आत्मनिर्भरतेसाठी आणखी कशाची गरज आहे?**

: आत्मनिर्भर भारतासाठी प्रत्येक भारतीयाला वाटलं पाहिजे, की आपण काही तरी योगदान द्यायला हवं. प्रत्येकाने आपापल्या क्षेत्राला हातभार लावला पाहिजे. मग तुम्ही पत्रकार असाल, शेतकरी, उत्पादक, अभियंता किंवा आणखी कोणी असाल, असा विचार करायची वेळ नाही, की माझ्यासाठी काय आहे? पंतप्रधानांनी जी संकल्पना सर्वांपुढे ठेवली आहे, त्यामुळे देशाचा भावनांक वाढला. जेव्हा भावनांक वाढतो तेव्हा देश एकत्र होतो आणि प्रगतीला चालना मिळते. कोरोना काळात आत्मनिर्भर भारत या धोरणामुळेच पीपीई किटपासून लसीकरणापर्यंत आपण आत्मनिर्भरता सिद्ध केली.

**: अजून कार्यरत राहण्यामागची प्रेरणा काय?**

: मी स्वतःलाही कधी कधी हा प्रश्न विचारतो. खरं तर मी कधीच निवृत्त व्हायला पाहिजे होतं. पण काम करत राहणं ही माझी 'पॅशन' आहे. जर तुम्हाला तंत्रज्ञानाची आवड असेल, तर या जगात बरंच काही करण्यासारखं आहे. मी अभियंता आहे. तंत्रज्ञानाची आवड आहे. नवीन गोष्टींची आवड आहे. त्यामुळे मला काम करत राहावसं वाटतं.

**: पुण्याच्या विकासाबद्दल काय वाटतं?**

: पुण्याचा विकास योग्य पद्धतीने होत आहे. सरकारच्या नव्या धोरणांचा फायदा घेऊन पुणे एक मजबूत शहर म्हणून पुढे येत आहे. फक्त एकच प्रश्न आहे आणि तो म्हणजे पुणे वाढत आहे व पायाभूत सुविधा तोकड्या पडत आहेत. म्हणजे रस्ते तेच, पण लोकसंख्या वाढली आहे. २५ वर्षांपासून रिंगरोडबाबत फक्त चर्चा ऐकतो आहे. जगात सगळीकडे नदीकाठचे रस्ते विकसित झाले. विमानतळ बाजूला राहू द्या, साधा नदीकाठचा रस्ता आपण पूर्ण करू शकलो नाही.

### गोधन ही भारताची शक्ती!

**गोधन हीच भारताची खरी शक्ती आहे; पण त्याचा नियोजनबद्ध वापर होत नाही. त्याचा योग्य उपयोग केला तर पारंपरिक ऊर्जास्रोताचा प्रश्न आपण मोठ्या प्रमाणावर सोडवू शकतो. शून्य कार्बन करण्यासाठीही हे उपयुक्त माध्यम ठरू शकतं, याकडेही गांभीर्याने बघण्याची नितांत गरज आहे, असे बाबा कल्याणी यांनी आवर्जून सांगितले.**


**NOTICE OF REQUIREMENT FOR EMPLOYEE TRANSPORTATION CAB SERVICE.**

A Multinational Company invites you to submit the quotation for Employee transportation services for the Pune office i.e. within the City commute. Interested agencies can contact & submit their proposal to below mentioned mail id only on or before 8th June 2022.

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Sakal |
|---|---|
| Date : June 5, 2022 | Journalist: |

## नितीन गडकरी : उद्योजक बाबा कल्याणी यांना पुण्यभूषण पुरस्कार प्रदान

# उद्योगशीलतेला प्रोत्साहन गरजेचे

पुणे, ता. ४ : "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आत्मनिर्भर भारताचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी उद्यम आणि उद्योगशीलतेला प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. त्याद्वारेच देशातील बुद्धिमत्तेला चालना मिळेल," असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी केले.

'त्रिदल', पुण्यभूषण फाउंडेशनचा ३२ वा पुण्यभूषण पुरस्कार ज्येष्ठ उद्योजक बाबा कल्याणी यांना केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते कार्यक्रमात प्रदान केला. सैन्यात सेवा बजावत असताना जायबंदी झालेल्या ५ जवानांचादेखील या कार्यक्रमात सन्मान करण्यात आला.

"आत्मनिर्भर भारत बनण्याच्या प्रक्रियेत जाणाऱ्या मार्गावर अग्रक्रमावर असलेल्या बाबा कल्याणी यांचा आज सत्कार होत आहे, ही आनंदाची बाब आहे," असे सांगत मंत्री गडकरी म्हणाले, "समाजकारण, अर्थकारण, राजकारण आदी सर्व क्षेत्रांत पुण्याचा वारसा मोठा आहे. आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी उत्पादन क्षेत्रात दुपटीने वाढ करावी लागणार आहे. यासाठी कल्याणींसारख्या उद्योगपतींची आवश्यकता आहे. उच्च शिक्षणात उद्यम आणि उद्योगशीलता निर्माण होण्यासाठी लक्ष द्यावे लागणार आहे. शून्यातून उद्योग उभारणाऱ्या उद्योजकांची माहिती युवा पिढीला दिली पाहिजे," अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त या वेळी केली.

मंत्री गडकरी म्हणाले, "आयातीवर अवलंबितता कमी करत असताना निर्यातीवर भर देण्याचा प्रयत्न सुरू आहे. जगातील सर्वाधिक बुद्धिमान युवक भारतात आहे. देशाला सर्वाधिक जीएसटी आणि रोजगार देणारा उद्योग म्हणून वाहन उद्योगाकडे पाहिले जाते. जगातील उद्योग आता भारतात येणार आहेत. पुणे आयटीप्रमाणे ऑटोमोबाइल हबही होऊ शकते. पुणे-बंगळूर आणि पुणे-औरंगाबाद रस्त्याचे लवकरच काम सुरू होत असून, त्यामुळे प्रवासाचा वेळ वाचणार आहे. या मार्गाच्या बाजूने नवीन पुणे विकसित झाले पाहिजे." डॉ. सतीश देसाई यांनी प्रास्ताविक केले, योगेश देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले तर सुरेश धर्मावत यांनी आभार मानले.

या प्रसंगी सत्काराला उत्तर देताना कल्याणी म्हणाले, "माझ्या कारकिर्दीला ५० वर्षे पूर्ण होत असताना पुण्यभूषण पुरस्कार मिळत असल्याचा आनंद आहे. देशात १९९१ नंतर उदारीकरणाचे धोरण राबविल्याने उद्योगांची प्रगती झाली. भारत फोर्जनेही या काळात प्रगती केली. प्रगत देशाच्या तंत्रज्ञानावर आपण थोड्या अधिक मेहनतीने मात करू, हे आमच्या लक्षात आले. आत्मनिर्भर भारत संकल्पनेमुळे देशाची प्रगती होणार आहे." धातुशास्त्र तंत्रात भारत जगात पुढे होता. आम्ही संरक्षण क्षेत्रातील उत्पादन खासगी क्षेत्राला खुले करण्याचा आग्रह सरकारच्या मेक इन इंडिया परिषदेत केला. त्याला परवानगी मिळाल्यानेच आधुनिक तोफा निर्मितीचे लक्ष्य साध्य केले. भारतीय स्वातंत्र्याला शंभर वर्षे पूर्ण होताना देश जगातील पहिल्या तीन क्रमांकात असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



बालगंधर्व रंगमंदिर, पुणे : ज्येष्ठ उद्योजक बाबा कल्याणी यांना शनिवारी पुण्यभूषण पुरस्कार प्रदान करताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी. या वेळी (डावीकडून) डॉ. सतीश देसाई, डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रकाश जावडेकर, गडकरी, कल्याणी, गिरीश बापट, श्रीनिवास पाटील, डॉ. शां. ब. मुजुमदार, प्रतापराव पवार आणि चंदू बोर्डे.

> कल्याणी यांचा सत्कार ही आनंदाची बाब असून, नवीन संशोधनाचा सन्मान आहे. संशोधनाची ताकद मोठी आहे. त्याद्वारेच देशाचा विकास होणार आहे. ब्रिटिशांनी आपला व्यापार, संशोधन, कला यांवर आघात केला.
> - प्रकाश जावडेकर, खासदार

> सर्वोत्कृष्ट काम करण्याची प्रेरणा कल्याणींपासून मिळत असते. प्रत्येक उत्पादन सर्वोत्कृष्ट तयार करण्याचा त्यांचा ध्यास असतो. त्यांची सामाजिक जाणीवही स्पृहणीय आहे.
> - प्रतापराव पवार,
> अध्यक्ष, सकाळ माध्यम समूह

> काळाच्या पुढचा विचार करून आत्मनिर्भर भारताचे स्वप्न कल्याणी यांनी अनेक दशकांपूर्वी साकार केले आहे.
> - डॉ. रघुनाथ माशेलकर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ

> मराठी पाऊल पुढे पडत असल्याचे कल्याणी यांच्या तीन पिढ्यांनी दाखवून दिले आहे.
> - श्रीनिवास पाटील, खासदार

> कल्याणी उद्योगातील, तर गडकरी रस्ते कामातील क्रांतिकारक आहेत. रोज ते नवनवीन काहीतरी करीत असतात.
> - गिरीश बापट, खासदार

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Prabhat |
|---|---|
| Date : June 5, 2022 | Journalist: |



पुणे : ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी यांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते पुण्यभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवर.

# आर्थिक बळकटीसाठी निर्यातीला प्राधान्य द्यावे लागणार : गडकरी

## ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी यांना 'पुण्यभूषण' पुरस्कार

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ४ - 'भारताची आर्थिक व्यवस्था बळकट करण्यासाठी विविध उत्पादनाच्या आयातीपेक्षा निर्यातीला अधिक प्राधान्य देण्याची गरज निर्माण झालेली आहे. कल्पक तरुण ही आपली ताकद असून त्यांच्यातील उद्योगशिलता व उद्यमशीलतेला चालना दिल्यास आत्मनिर्भर भारत बनविण्याचे स्वप्न साकार होणार आहे,' असे मत केंद्रीय रस्ते व वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले.

पुण्यभूषण फाउंडेशन व पुणेकरांच्या वतीने बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात नितीन गडकरी यांच्या हस्ते ३२ वा पुण्यभूषण पुरस्कार ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी यांना प्रदान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी पुण्यभूषण पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ.रघुनाथ माशेलकर, खासदार श्रीनिवास पाटील, गिरिश बापट, माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, सिम्बायोसिसचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शां. ब. मुजूमदार, उद्योगपती प्रतापराव पवार, माजी क्रिकेटपटू चंदू बोर्डे, पुण्यभूषण फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई, गजेंद्र पवार आदी उपस्थित होते. भारतात लवकर इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, ट्रकच्या लॉंचिंग होणार आहे. पुणे ते बंगळुरू, पुणे ते औरंगाबाद या रस्त्यांची कामे येत्या सहा महिन्यांत हाती घेण्यात येणार आहेत. पुण्याला जोडणाऱ्या रिंगरोडची कामेही करण्यात येणार आहेत, असे गडकरी म्हणाले.

कार्यक्रमात पुण्यातील 'जायबंदी' संस्थेतील धरमवीर सिंग, सुरेशकुमार कर्की, के. नागी रेड्डी, बलवीर सिंग, बहादुर गुरुंग या पाच स्वातंत्र्य सैनिकांचाही गडकरी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन योगेश देशपांडे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. सतीश देसाई यांनी केले. आभार काका धर्मावत यांनी मानले.

### पुण्यात प्रदूषण, वाहतूक कोंडी वाढली

आता पूर्वीचे जुने पुणे राहिले नाही. पुण्यात प्रदूषण, वाहतूक कोंडी, गर्दी वाढली आहे. पुण्याचे वेगळे वैशिष्ट असल्याने अनेकदा पुण्याने देशाला दिशा दिली आहे. पुण्यात आयटी, ऑटोमोबाइल उद्योग वाढला आहे. आता पुण्याने मॅन्युफॅक्चरिंग हब म्हणून जगाच्या नकाशावर स्थान निर्माण करण्याची आवश्यकता आहे, असे मत गडकरी यांनी व्यक्त केले आहे.

" आत्मनिर्भर भारत व डिजिटलाजेशन क्रांती घडविणार आहे. अमेरिका व चीननंतर भारताचा स्टार्ट अपच्या क्षेत्रात तिसरा क्रमांक आहे. केंद्रीय स्तरावरील धोरणांमध्ये आमूलाग्र बदल झाले आहेत. यामुळे नवचैतन्य निर्माण झाले आहे. प्रत्येक नागरिकाने पुढे येऊन भारताच्या प्रगतीसाठी योगदान देण्याची गरज आहे. सन २०३० पर्यंत भारत एक सशक्त आर्थिक ताकद म्हणून उभा राहिल

– **बाबा कल्याणी**, ज्येष्ठ उद्योगपती

| Headline: Mr Baba Kalyani wins Punyabhushan Award | Publication : Lokmat |
|---|---|
| Date : June 5, 2022 | Journalist: |

# तंत्रज्ञानाच्या जोरावर भारत जगात दुसऱ्या क्रमांकावर असेल

## ज्येष्ठ उद्योजक बाबा कल्याणी : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते पुण्यभूषण पुरस्कार प्रदान

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : आत्मनिर्भर म्हणजे आपल्याच देशात उत्पादन करणे आहे. बाहेरून काहीच आणायचे नाही. कारण आपण जेव्हा उत्पादन आयात करतो तेव्हा गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ विकसित करू शकत नाही. गुणवत्ता, तंत्रज्ञान याची कास धरून प्रगती झाली पाहिजे. स्टार्ट अप इंडस्ट्री मोठी असल्याने तंत्रज्ञान आणि गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ निर्माण होत आहे. त्यामुळे जीडीपीची गती वाढणार आहे. कोरोना, रशिया-युक्रेन युद्धामुळे त्याला खीळ बसली. ताकद, तंत्रज्ञानाच्या बळावर भारत शंभराव्या वर्षी जगात दुसऱ्या क्रमांकावर असेल, असा विश्वास ज्येष्ठ उद्योजक बाबा कल्याणी यांनी व्यक्त केला.

उद्योग क्षेत्रात अतुलनीय योगदान देणाऱ्या बाबासाहेब नीळकंठ कल्याणी यांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते 'पुण्यभूषण पुरस्कार' शनिवारी प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.



पुण्यभूषण फाउंडेशनच्या वतीने पुण्यभूषण पुरस्कार प्रदान समारंभात (डावीकडून) डॉ. सतीश देसाई, डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रकाश जावडेकर, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, ज्येष्ठ उद्योजक बाबा कल्याणी, गिरीश बापट, श्रीनिवास पाटील, डॉ. शा. ब. मुजुमदार आदी. (छायाचित्र : सुशील राठोड)

यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, खासदार गिरीश बापट, माजी क्रिकेटपटू चंदू बोर्डे, प्रकाश जावडेकर, सिंबायोसिसचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शां.ब. मुजुमदार, खासदार श्रीनिवास पाटील, गजेंद्र पवार, डॉ. सतीश देसाई उपस्थित होते. बाल शिवाजींची प्रतिकृती, स्मृतिचिन्ह आणि १ लाख रुपयांच्या रकमेची थैली असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

### पुणे मॅन्युफॅक्चरिंग हब व्हावे

शिक्षणाचे माहेरघर, सांस्कृतिक राजधानी, आयटी हब अशी पुण्याची ओळख आहे. येत्या काळात पुणे हे मॅन्युफॅक्चरिंग हब करण्याच्या दृष्टीने नियोजन केल्यास हे शहर नावारुपाला येईल. नवे सॅटेलाईट पुणे या भागात निर्माण केले पाहिजे. आयात कमी करून निर्यात वाढवली तरच देश प्रगती करु शकेल असेही नितीन गडकरी म्हणाले.

'बाबा कल्याणी हे औद्योगिक राष्ट्रवादाचे प्रतीक आहेत. त्यासाठी असे उद्योजक निर्माण झाले पाहिजेत, अशा शब्दांत गडकरी यांनी गौरवोद्गार काढले.

ADFACTORS PR
Knowledge-driven communications

**Online Coverage**

| No. | Publication/Portal | Headline | Date |
|---|---|---|---|
| 1 | Financial Express | All set to roll out Tork electric motorcycles this month: Baba Kalyani | 5 June 2022 |
| 2 | Times of India | India to be net defence exporter by 2030, says Baba Kalyani | 5 June 2022 |
| 3 | Times of India | ‘Eco nationalism’ required to trim imports: Nitin Gadkari | 5 June 2022 |
| 4 | Loksatta | आर्थिक राष्ट्रवादाचे बाबा कल्याणी हे प्रतीक!; नितीन गडकरी यांच्याकडून कौतुक | 5 June 2022 |
| 5 | Maharshtra Lokmanch | प्रतिभा निर्मितीमुळे देश प्रगतीपथावर: बाबा कल्याणी | 5 June 2022 |
| 6 | Maharashtra Times | पंचवीस वर्षांपासून रखडला पुण्याचा रिंग रोड, बाबा कल्याणी यांची खंत | 5 June 2022 |
| 7 | Pudhari | आत्मनिर्भर भारतासाठी नवकल्पना आवश्यक; भारत फोर्जचे अध्यक्ष कल्याणी यांचे प्रतिपादन | 5 June 2022 |
| 8 | Navarashtra | बाबा कल्याणी हे औद्योगिक राष्ट्रवादाचे प्रतिक : नितीन गडकरी | 5 June 2022 |

| Headline: All set to roll out Tork electric motorcycles this month: Baba Kalyani | Publication : Indian Express |
|---|---|
| Date : June 5, 2022 | Journalist: |

All set to roll out Tork electric motorcycles this month: Baba Kalyani | Business News,The Indian Express

It took forging company Bharat Forge 61 years to reach an annual turnover of Rs 10,000 crore. Chairman and MD Baba Kalyani is confident of the next Rs 10,000 crore coming at a faster pace, with the company set to double or triple turnover in the next 10 years.

Having joined the company started by his father Neelakanth Kalyani 50 years ago, Baba Kalyani, 73, says the past 10 years have been the busiest in his life. "If you have a passion to do something then many things can be done," he says as he completes 50 years at the helm of Bharat Forge. It is no longer just a forging or auto component manufacturing company, but a technology company, says Kalyani. With a presence in auto, defence, aerospace, oil and gas, electric mobility. railways and renewable energy, Kalyani says they are in the business of providing safety and security for mobility, energy and for the country.

The company is working vigorously in the electric vehicle business through a subsidiary company, Kalyani Powertrain. A new factory is all set to roll out the Tork electric motorcycles this month. Next will be an electric truck, says Kalyani. Technology centres in Detroit and Los Angeles are working on e-mobility.

It took forging company Bharat Forge 61 years to reach an annual turnover of Rs 10,000 crore. Chairman and MD Baba Kalyani is confident of the next Rs 10,000 crore coming at a faster pace, with the company set to double or triple turnover in the next 10 years.

Having joined the company started by his father Neelakanth Kalyani 50 years ago, Baba Kalyani, 73, says the past 10 years have been the busiest in his life. "If you have a passion to do something then many things can be done," he says as he completes 50 years at the helm of Bharat Forge. It is no longer just a forging or auto component manufacturing company, but a technology company, says Kalyani. With a presence in auto, defence, aerospace, oil and gas, electric mobility. railways and renewable energy, Kalyani says they are in the business of providing safety and security for mobility, energy and for the country.

The company is working vigorously in the electric vehicle business through a subsidiary company, Kalyani Powertrain. A new factory is all set to roll out the Tork electric motorcycles this month. Next will be an electric truck, says Kalyani. Technology centres in Detroit and Los Angeles are working on e-mobility.

"By 2030, India will be a very different country from what it is now. Our GDP can be around $7-8 trillion," he says. Climate change and the shift to digital manufacturing would pose significant challenges, he adds. "The country historically has a talent pool that is based on analog technology and there is an immediate need to convert the existing talent pool to digital," adds Kalyani. The workforce at Bharat Forge has completed their training in Industry 4.0 and not many want to leave despite multiple rounds of VRS.

Kalyani was felicitated in Pune on Saturday and conferred the ‘Punyabhushan’ award to celebrate his achievements.

| **Headline: India to be net defence exporter by 2030, says Baba Kalyani** | **Publication : Times of India** |
|---|---|
| Date : June 5, 2022 | Journalist: |

https://timesofindia.indiatimes.com/city/pune/india-to-be-net-defence-exporter-by-2030-says-baba-kalyani/articleshow/91978638.cms

PUNE: Industrialist Baba Kalyani on Thursday said India would be a net defence equipment exporter by 2030 in view of its current policies on indigenisation.
"By 2030, India will be a different country to what it is now. Our GDP can be around US $7-8 trillion, and we should be a net exporter in defence equipment by then," Kalyani said during a press conference on the 'Punyabhushan Puraskar' by the Punyabhushan Foundation, which was announced in 2020, but will be awarded to Kalyani at a ceremony on Saturday.

He added, "However, there are significant challenges, the biggest one of which is climate change. We have to be able to figure out how to achieve net zero in carbon emissions. Related to that is the challenge of reducing energy consumption, which has to be achieved via creating a circular economy, and the increased use of renewables. "
"I believe that internal combustion engines will disappear within 30-40 years. We have been investing in electric mobility and green hydrogen production. We have also invested in e-mobility firm Tork, and producing electric powertrains for three wheelers," he said.

Kalyani's Bharat Forge now has significant interests in the Indian defence manufacturing sector, producing artillery, armoured vehicles and tech-based defence systems.
The group has also been transforming away from forges to a full original equipment manufacturer (OEM), with upcoming investments and R&D into defence and electric mobility, among other segments.

| Headline: 'Eco nationalism' required to trim imports: Nitin Gadkari | Publication : Times of India |
|---|---|
| Date : June 5, 2022 | Journalist: Shiladitya Pandit |

https://timesofindia.indiatimes.com/city/pune/gadkari-eco-nationalism-required-to-trim-imports/articleshow/92011883.cms

PUNE: Union road transport and highways minister Nitin Gadkari on Saturday said India needed more "economic nationalism" to reduce its dependence on imports.
He was speaking at the Punyabhushan Puraskar ceremony to honour industrialist Baba Kalyani, the ceremony for which was held at the Balgandharva Rangmandir on Saturday evening.

The event was attended by leaders across political spectrum, such as Pune MP Girish Bapat, former cabinet minister Prakash Javadekar and Satara MP Shriniwas Patil, among other people. Cricket legend Chandu Borde, himself an honouree of the Punyabhushan Puraskar, also attended the programme.
"We need to double our efforts to become self-reliant, as per the message of Prime Minister Narendra Modi. That way, we probably need a hundred Baba Kalyanis in India. We still have to develop skills in entrepreneurship and enterprises over the next few years. More economic nationalism is needed to increase exports and reduce imports," the Union minister said.

"Baba Kalyani is a proponent of the economic nationalism we need. We have the raw material and manpower that we need to succeed," he said, while speaking about upcoming road projects in Maharashtra, such as the Pune-Bengaluru Expressway, which "would dramatically cut travel time between the two cities".
In his address, Kalyani praised Gadkari's "can-do attitude", while calling him the soul of Atmanirbhar Bharat initiatives.
"We have developed talent and technology in India. Right now, there are a number of adverse effects of the Russia-Ukraine conflict, such as increasing prices of raw material. It will take some time for the economy to recover from that. But I believe that India will be among the top three countries in the global economy in the future," Kalyani said.

| Headline: आर्थिक राष्ट्रवादाचे बाबा कल्याणी हे प्रतीक!; नितीन गडकरी यांच्याकडून कौतुक | Publication : Loksatta |
|---|---|
| Date : June 5, 2022 | Journalist: |

https://www.loksatta.com/pune/baba-kalyani-symbol-economic-nationalism-appreciation-from-nitin-gadkari-ysh-95-2959225/

पुणे : जगभरात हजारो कोटी रुपयांची उत्पादने निर्यात करणारे बाबा कल्याणी हे खऱ्या अर्थाने आर्थिक राष्ट्रवादाचे प्रतीक आहेत, अशा शब्दांत केंद्रीय वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी बाबा कल्याणी यांचा शनिवारी गौरव केला. भारताला आत्मनिर्भर करण्यासाठी सकल राष्ट्रीय उत्पादनातील (जीडीपी) उत्पादन क्षेत्राचा वाटा किमान दुप्पट करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी किमान शंभर बाबा कल्याणी निर्माण झाले पाहिजेत, असेही गडकरी म्हणाले. पुण्यभूषण फाउंडेशनतर्फे गडकरी यांच्या हस्ते ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी यांना पुण्यभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्याप्रसंगी गडकरी बोलत होते.

माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, खासदार गिरीश बापट, श्रीनिवास पाटील, पुण्यभूषण निवड समितीचे अध्यक्ष व ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. शां. ब. मुजुमदार, चंदू बोर्डे, प्रतापराव पवार, फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई आणि गजेंद्र पवार उपस्थित होते. देशाच्या रक्षणासाठी अपंगत्व पत्करलेल्या पाच सैनिकांचा या वेळी सन्मान करण्यात आला.

गडकरी म्हणाले, बाबा कल्याणी यांचा गौरव हा आत्मनिर्भर भारताच्या नेतृत्वाचा सत्कार आहे. आत्मनिर्भर भारत साकारण्यासाठी आयात कमी करून निर्यात वाढविण्याची गरज आहे. त्यासाठी देशातील युवकांना उद्योजकता आणि उद्यमशीलतेचे शिक्षण देण्याची गरज असून बाबा कल्याणी हे त्याचे मूर्तिमंत उदाहरण आहेत. शिक्षणाचे माहेरघर, सांस्कृतिक राजधानी, माहिती तंत्रज्ञानाचे केंद्र ही जशी पुण्याची ओळख आहे त्याचप्रमाणे येत्या काळात पुणे हे उत्पादनाचे केंद्र म्हणून जगाच्या नकाशावर ठळक स्थान पटकावेल. मात्र, हे करताना पुण्याच्या पर्यावरणाचे नुकसान होणार नाही आणि वाहतूक कोंडी होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागेल.

भारत फोर्जमध्ये मी कामाला सुरुवात केली त्याला ५० वर्षे होत असतानाच पुण्यभूषण पुरस्कार मिळणे भाग्याचे आहे, अशी भावना कल्याणी यांनी व्यक्त केली. उदारीकरणानंतर आम्हाला विस्तार करण्याची आणि जागतिक पातळीवर झळकण्याची संधी मिळाली. आता भारत फोर्ज फोर्जिंगमधील जगातील पहिल्या क्रमांकाची कंपनी झाली आहे, असे कल्याणी यांनी सांगितले. कल्याणी म्हणाले, आयात कमी, निर्यात अधिक म्हणजे आत्मनिर्भर भारत. एखादे उत्पादन आपण आयात करतो याचा अर्थ आपण त्यासाठीची गुणवत्ता, क्षमताही निर्माण करू शकत नाही. गुणवत्ता आणि तंत्रज्ञानाची सांगड घालून भारताची वेगाने प्रगती झाली. करोनाची दोन वर्षे आणि रशिया-युक्रेन युद्धामुळे त्याला खीळ बसत आहे. देशाच्या शताब्दी वर्षांत भारत आपल्या तंत्रज्ञानावर जगात दुसऱ्या क्रमांकावर असेल. जावडेकर, बापट, डॉ. माशेलकर, पवार, पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. देसाई यांनी प्रास्ताविक केले. योगेश देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. काका धर्मावत यांनी आभार मानले.

| Headline: प्रतिभा निर्मितीमुळे देश प्रगतीपथावर: बाबा कल्याणी | Publication : Maharashtra Lokmanch |
|---|---|
| Date : June 5, 2022 | Journalist: |

प्रतिभा निर्मितीमुळे देश प्रगतीपथावर: बाबा कल्याणी - Maharashtra Lokmanch

पुणे : त्रिदल – पुणे , पुण्यभूषण फाऊंडेशनचा ३२ वा पुण्यभूषण पुरस्कार ज्येष्ठ उद्योजक बाबा कल्याणी यांना केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते शनीवारी सायंकाळी बालगंधर्व रंगमंदिर येथे झालेल्या शानदार कार्यक्रमात देण्यात आला.

निवड समितीचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर, माजी केंदीय मंत्री प्रकाश जावडेकर,माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, डॉ. शां. ब. मुजुमदार, चंदू बोर्डे, प्रतापराव पवार, पुण्यभूषण फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई , गजेंद्र पवार व्यासपीठावर उपस्थित होते.

नितीन गडकरी म्हणाले, ' आत्मनिर्भर भारत ज्यांच्या नेतृत्वाखाली घडवायचे आहे, त्या नेतृत्वाचा हा सत्कार आहे.पाच ट्रिलियन ची अर्थव्यवस्था करण्याचे पंतप्रधानांचे लक्ष्य आहे.आत्मनिर्भर भारत करण्यासाठी औद्योगिक उत्पादन दुप्पट केले पाहिजे. निर्यात वाढवावी लागेल. उद्यमशील कतृत्वे सर्वांसमोर आली पाहिजे. उद्यमशीलता वाढली पाहिजे.औद्योगिक राष्ट्रवाद महत्वाचा असून बाबा कल्याणी त्याचे प्रतिक आहेत. इलेक्ट्रिक वाहन निर्मितीमुळे मोठी व्यापार पेठ निर्माण होणार आहे. पुणे -बंगळूरु महामार्गाच्या कामाला सुरवात होत असून साडेतीन तासाचा हा प्रवास असेल. नवे सॅटेलाईट पुणे या भागात निर्माण केले पाहिजे.ऑटोमोबाईल इंडस्ट्री साडेसहा लाख कोटीवर नेण्याचा माझा प्रयत्न आहे. युवा पिढी हुशार असून ती चांगले काम करीत आहे. उद्यमशीलतेला पोषक वातावरण पाहता पुणे जगाच्या नकाशावर आजच्या पेक्षा महत्वाचे शहर बनेल.

पुरस्कार, सन्मानाला उत्तर देताना बाबा कल्याणी म्हणाले, ' माझ्या कारकिर्दीला ५० वर्ष होत असताना पुण्यभूषण पुरस्कार मिळत असल्याचा आनंद आहे.पुण्यातील सर्व क्षेत्रातील पोषक वातावरणामुळे प्रगती झाली, हे विसरता येणार नाही.

उदारीकरण (लिबरलायझेशन ) नंतर उद्योगांची प्रगती झाली. निर्यात सुरू झाली. भारत फोर्जनेही या काळात प्रगती केली. प्रगत देशाच्या तंत्रज्ञानावर आपण थोडया अधिक मेहनतीने मात करू, हे आमच्या लक्षात आले. नवनवीन उत्पादन सुरू करणे म्हणजे नवनवीन प्रतिभा निर्मिती करणे होय.आत्मनिर्भर भारत संकल्पनेमुळे देशाची प्रगती होणार आहे. भारतीय स्वातंत्र्याला शंभर वर्ष पूर्ण होताना देश जगातील पहिल्या तीन क्रमांकात असेल.

धातूशास्त्र (मेटलर्जी ) तंत्रात भारत जगात पुढे होता. ते सांगूनच आम्ही संरक्षण क्षेत्रातील उत्पादन खासगी क्षेत्राला खुले करण्याचा आग्रह सरकारच्या मेक इन इंडिया परिषदेत केला. त्याला परवानगी मिळाल्यानेच आधुनिक तोफा निर्मितीचे लक्ष्य साध्य केले.

आत्मनिर्भर भारताचा आत्मा नितीन गडकरी आहेत. रस्ते उभारणीच्या कामाने देशाचे भविष्य उज्वल होणार आहे, असेही कल्याणी म्हणाले.

डॉ. सतीश देसाई यांनी प्रास्ताविक केले.योगेश देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. सुरेश ( काका ) धर्मावत यांनी आभार मानले.

| Headline: पंचवीस वर्षांपासून रखडला पुण्याचा रिंग रोड, बाबा कल्याणी यांची खंत | Publication : Maharashtra Times |
| --- | --- |
| Date : June 5, 2022 | Journalist: |

punyabhushan award: पंचवीस वर्षांपासून रखडला पुण्याचा रिंग रोड, बाबा कल्याणी यांची खंत - baba kalyani statement on pune ring road | Maharashtra Times

म. टा. प्रतिनिधी, पुणे ः 'पुणे सक्षम औद्योगिक नगरी म्हणून उदयास येत असताना, त्या तुलनेत शहरातील पायाभूत सुविधा विस्तारलेल्या नाहीत. लोकसंख्या वाढत असताना, रस्ते तेवढेच राहिले आहेत. शहराला दोन रिंगरोडची आवश्यकता असताना, पंचवीस वर्षांपासून रिंगरोडचा प्रकल्प रखडला आहे. साधा नदीकाठचा रस्ताही पूर्ण झालेला नाही,' अशी खंत ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी यांनी व्यक्त केली.

'भारत फोर्ज' या जगातील सर्वांत मोठ्या फोर्जिंग कंपनीचे सर्वेसर्वा बाबा कल्याणी यांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्या, शनिवारी (४ जून) 'पुण्यभूषण' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. या निमित्ताने त्यांनी पत्रकारांनी संवाद साधला. या वेळी ते बोलत होते.

'पुण्यातील तंत्रकुशल उद्योजकांमुळे सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग क्षेत्र वेगाने विकसित होत आहे. त्या जोरावर मोठ्या कंपन्या प्रगती करत आहेत. त्यामुळे पुणे सक्षम औद्योगिक शहर म्हणून उदयास येत आहे. मात्र, त्या तुलनेत पायाभूत सुविधा वाढलेल्या नाहीत. पायाभूत सुविधांमुळेच शहराची कार्यक्षमता व उत्पादकता वाढून आर्थिक समृद्धी येते,' असेही त्यांनी नमूद केले.

'भारत २०३० पर्यंत आर्थिकदृष्ट्या सक्षम औद्योगिक राष्ट्र आणि संरक्षण उत्पादन क्षेत्रात सर्वांत मोठा निर्यातदार म्हणून उदयास येईल,' असा विश्वास व्यक्त करून कल्याणी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेचे कौतुक केले. 'पूर्वी केवळ सरकारकडे हात पसरावे लागत होते. मात्र, आता आत्मनिर्भर भारत धोरणामुळे देशाचे मनोबल उंचावले असून, आपण आपल्या ताकदीवर प्रगती साधू शकतो. प्रत्येक भारतीयाने आपापल्या क्षेत्रात देश स्वयंपूर्ण होण्यासाठी योगदान दिले पाहिजे,' असे आवाहनही त्यांनी केले.

'करोना संकट आणि रशिया-युक्रेन युद्धामुळे कच्च्या तेलाची दुपटीने भाववाढ झाली आहे. युक्रेनमधून गव्हाची निर्यात थांबल्याने जगात खाद्य संकट निर्माण झाले आहे. परिणामी जागतिक अर्थव्यवस्था मंदावली असून, अनेक देशांत महागाईच्या दराने सात-आठ टक्क्यांची पातळी गाठली आहे. त्यामुळे जगाला भयंकर आर्थिक परिणाम भोगावे लागणार आहेत. त्यासाठी देशाने स्वावलंबी व आर्थिकदृष्ट्या समृद्ध होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत,' असे आवाहनही बाबा कल्याणी यांनी केले.

पुणे शहराला मोठा इतिहास असून, अनेक विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, उद्योजकांनी पुणे औद्योगिक नगरी म्हणून विकसित करण्यात योगदान दिले आहे. आपल्या शहराच्या नावाने पुरस्कार मिळणे माझ्यासाठी अभिमानास्पद व आनंदाची बाब आहे.

| Headline: आत्मनिर्भर भारतासाठी नवकल्पना आवश्यक; भारत फोर्जचे अध्यक्ष कल्याणी यांचे प्रतिपादन | Publication : Pudhari |
|---|---|
| Date : June 5, 2022 | Journalist: |

https://pudhari.news/maharashtra/pune/218064/%e0%a4%86%e0%a4%a4%e0%a5%8d%e0%a4%ae%e0%a4%a8%e0%a4%bf%e0%a4%b0%e0%a5%8d%e0%a4%ad%e0%a4%b0-%e0%a4%ad%e0%a4%be%e0%a4%b0%e0%a4%a4%e0%a4%be%e0%a4%b8%e0%a4%be%e0%a4%a0%e0%a5%80-%e0%a4%a8%e0%a4%b5%e0%a4%95%e0%a4%b2%e0%a5%8d%e0%a4%aa%e0%a4%a8%e0%a4%be-%e0%a4%86%e0%a4%b5%e0%a4%b6%e0%a5%8d%e0%a4%af%e0%a4%95-%e0%a4%ad%e0%a4%be%e0%a4%b0%e0%a4%a4-%e0%a4%ab%e0%a5%8b%e0%a4%b0%e0%a5%8d%e0%a4%9c%e0%a4%9a%e0%a5%87-%e0%a4%85%e0%a4%a7%e0%a5%8d%e0%a4%af%e0%a4%95%e0%a5%8d%e0%a4%b7-%e0%a4%95%e0%a4%b2%e0%a5%8d%e0%a4%af%e0%a4%be%e0%a4%a3%e0%a5%80-%e0%a4%af%e0%a4%be%e0%a4%82%e0%a4%9a%e0%a5%87-%e0%a4%aa%e0%a5%8d%e0%a4%b0%e0%a4%a4%e0%a4%bf%e0%a4%aa%e0%a4%be%e0%a4%a6%e0%a4%a8/ar

‘देशाचे उत्पादन क्षेत्र आत्मनिर्भर बनण्यासाठी तंत्रज्ञान-सक्षम नवकल्पना आवश्यक आहे,’ असे भारत फोर्ज कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक बाबा कल्याणी यांनी स्पष्ट केले. बाबा कल्याणी यांना पुण्यभूषण पुरस्कार जाहीर झाल्यानिमित्त त्यांच्याशी मुंढवा येथील भारत फोर्ज कंपनीत पत्रकारांचा विशेष संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते.

‘उदयोग क्षेत्रात आज तंत्रज्ञान सक्षम स्टार्टअपचे प्रमाण वाढत आहे. मेक इन इंडिया अंतर्गत आज देशातील अंदाजे 68 यूनिकॉर्न्सनी 25 लाख कोटींच्या उलाढालीचा टप्पा पार केला आहे. त्यांना प्रोत्साहन, पाठबळ मिळावे यासाठी पंतप्रधान मोदींनी अनेक उद्योग स्नेही धोरणे राबवली आहेत. आजमितीला भारतात येणाऱ्या स्टार्टअप कंपन्या या फिनटेक तंत्रज्ञानावर आधारित आहेत. पण आगामी काळ हा प्रामुख्याने डीपटेक तंत्रज्ञानाचा असणार आहे.

यात क्वान्टम कम्युटिंग, ड्रोन, एआयचा समावेश असणार आहे,’ असे ते म्हणाले. आर्टलरी गन हे संरक्षणाचे महत्त्वाचे आयुध असून टँक्स, रॉकेटसह आर्टीलरी गनचे उत्पादन करण्यास आम्ही पुढाकार घेतला आहे. यासाठी जगातील सर्वात आधुनिक प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पाद्वारे संपूर्ण भारतीय बनावटीच्या शस्त्रास्त्रांची आणि साहित्याची निर्मिती आम्ही करीत आहोत. देशाला या क्षेत्रात आत्मनिर्भरतेची गरज असल्याचा कल्याणी यांनी पुनरुच्चार केला.

‘जागतिक पातळीवर शस्त्रास्त्र निर्यातीतही भारत पुढील दशकभरात चांगली कामगिरी करेल,’ असे सांगताना बाबा कल्याणी म्हणाले की, पुढील काही वर्षात भारताची अर्थव्यवस्था ही अधिक सक्षम असणार आहे. जागतिक पातळीवर भारताची अर्थव्यवस्था 7 ते 8 ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहचण्याची शक्यता आहे.याच काळात शस्त्रास्त्र निर्यातीतही भारताचा वाटा मोठा असेल. ‘भारताच्या आत्मनिर्भरतेचे स्वप्न आवाक्यात आहे.

मात्र भारतीय उद्योगांना पर्यावरणातील बदल आणि उत्पादित वस्तूंचा पूर्नवापर (सेक्यूलर इकोनॉमी) करण्याच्या आव्हानांना सामोरं जावं लागणार आहे. सध्या सगळीकडे उर्जेचा वापर प्रत्येक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर केला जात आहे.परिणामी, कार्बन उर्जनामुळे पर्यावरण संतुलनात बिघाड होत आहे. त्यात सुधारणा करण्याची जबाबदारी प्रत्येक भारतीयाची आहे. अशावेळी नवीकरणीय उर्जेचा अधिकाधिक वापर फायदेशीर ठरणार आहे,’ असेही ते म्हणाले.

‘भारत हा कृषीप्रधान देश आहे. इथे गाईं, म्हशींची लोकसंख्याही मुबलक आहे.त्यांच्या शेणाचा वापर करुन मिथेन निर्मिती करणे शक्य आहे. त्यासाठी तंत्रज्ञानाचा योग्य वापर करुन शेणाचा पूर्नवापर करण्यावर भर दिला पाहिजे,’ असेही ते म्हणाले. ‘ईलेक्ट्रिक व्हेईकल्सच्या क्षेत्रात भारत फोर्ज कंपनी भरीव काम करत आहे. त्यामुळे इलेक्ट्रीक, हायड्रो इंजिन उत्पादनासाठी येथे मोठ्या प्रमाणात काम केले जाते.

पुढील 30 वर्षांच्या कालावधीत कार्बन उत्सर्जित करणाऱे आयसीए इंजिन्स बाद होतील, असे सुतोवाच बाबा कल्याणी यांनी केले. पर्यायी इंधन क्षेत्रात तीन चाकीसह इलेक्टि्रट ट्रक लवकरच बाजारात दाखल होणार आहेत. त्यासाठी पुण्यातील स्टार्टअप कंपनीसोबत करार केला आहे.आंतरराष्ट्रीय पातळीवरील तंत्रज्ञान भारतात आणण्याठी भारत फोर्जने अमेरिकेत दोन टेक सेंटर्स उभे केले आहेत,’ असे त्यांनी सांगितले.

| Headline: बाबा कल्याणी हे औद्योगिक राष्ट्रवादाचे प्रतिक : नितीन गडकरी | Publication : Navarashtra |
|---|---|
| Date : June 5, 2022 | Journalist: |

https://www.navarashtra.com/maharashtra/baba-kalyani-is-a-symbol-of-industrial-nationalism-nitin-gadkari-nrdm-288794/

पुणे : त्रिदल – पुणे , पुण्यभूषण फाऊंडेशनचा ३२ वा पुण्यभूषण पुरस्कार ज्येष्ठ उद्योजक बाबा कल्याणी यांना केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते शनीवारी सायंकाळी बालगंधर्व रंगमंदिर येथे झालेल्या शानदार कार्यक्रमात देण्यात आला.

निवड समितीचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर, माजी केंदीय मंत्री प्रकाश जावडेकर,माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, डॉ. शां. ब. मुजुमदार, चंदू बोर्डे, प्रतापराव पवार, पुण्यभूषण फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई , गजेंद्र पवार व्यासपीठावर उपस्थित होते.

सैन्यात काम करताना जायबंदी झालेल्या ५ जवानांचा देखील या कार्यक्रमात सन्मान करण्यात आला. डॉ. सतीश देसाई यांनी प्रास्ताविक केले.योगेश देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. सुरेश ( काका ) धर्मावत यांनी आभार मानले.

नितीन गडकरी म्हणाले, ‘ आत्मनिर्भर भारत ज्यांच्या नेतृत्वाखाली घडवायचे आहे, त्या नेतृत्वाचा हा सत्कार आहे. पाच ट्रिलियन ची अर्थव्यवस्था करण्याचे पंतप्रधानांचे लक्ष्य आहे. आत्मनिर्भर भारत करण्यासाठी औद्योगिक उत्पादन दुप्पट केले पाहिजे. निर्यात वाढवावी लागेल. उद्यमशील कतृत्वे सर्वांसमोर आली पाहिजे. उद्यमशीलता वाढली पाहिजे.औद्योगिक राष्ट्रवाद महत्वाचा असून बाबा कल्याणी त्याचे प्रतिक आहेत. इलेक्ट्रिक वाहन निर्मितीमुळे मोठी व्यापार पेठ निर्माण होणार आहे. पुणे -बंगळूरु महामार्गाच्या कामाला सुरवात होत असून साडेतीन तासाचा हा प्रवास असेल. नवे सॅटेलाईट पुणे या भागात निर्माण केले पाहिजे.

ऑटोमोबाईल इंडस्ट्री साडेसहा लाख कोटीवर नेण्याचा माझा प्रयत्न आहे. युवा पिढी हुशार असून ती चांगले काम करीत आहे. उद्यमशीलतेला पोषक वातावरण पाहता पुणे जगाच्या नकाशावर आजच्या पेक्षा महत्वाचे शहर बनेल.

पुरस्कार, सन्मानाला उत्तर देताना बाबा कल्याणी म्हणाले, ‘ माझ्या कारकिर्दीला ५० वर्ष होत असताना पुण्यभूषण पुरस्कार मिळत असल्याचा आनंद आहे. पुण्यातील सर्व क्षेत्रातील पोषक वातावरणामुळे प्रगती झाली, हे विसरता येणार नाही.

उदारीकरण (लिबरलायझेशन ) नंतर उद्योगांची प्रगती झाली. निर्यात सुरू झाली. भारत फोर्जनेही या काळात प्रगती केली. प्रगत देशाच्या तंत्रज्ञानावर आपण थोडया अधिक मेहनतीने मात करू, हे आमच्या लक्षात आले. नवनवीन उत्पादन सुरू करणे म्हणजे नवनवीन प्रतिभा निर्मिती करणे होय.आत्मनिर्भर भारत संकल्पनेमुळे देशाची प्रगती होणार आहे. भारतीय स्वातंत्र्याला शंभर वर्ष पूर्ण होताना देश जगातील पहिल्या तीन क्रमांकात असेल.

धातूशास्त्र (मेटलर्जी ) तंत्रात भारत जगात पुढे होता. ते सांगूनच आम्ही संरक्षण क्षेत्रातील उत्पादन खासगी क्षेत्राला खुले करण्याचा आग्रह सरकारच्या मेक इन इंडिया परिषदेत केला. त्याला परवानगी मिळाल्यानेच आधुनिक तोफा निर्मितीचे लक्ष्य साध्य केले. आत्मनिर्भर भारताचा आत्मा नितीन गडकरी आहेत. रस्ते उभारणीच्या कामाने देशाचे भविष्य उज्वल होणार आहे, असेही कल्याणी म्हणाले.

खा. गिरीश बापट म्हणाले, ‘ बाबा कल्याणी, नितीन गडकरी दोघेही क्रांतीकारक आहेत. बाबा कल्याणी उद्योगातील क्रांतीकारक, तर नितीन गडकरी हे रस्ते कामातील क्रांतीकारक आहेत. रोज ते नवनवीन काहीतरी करीत असतात.

डॉ. माशेलकर यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. माशेलकर म्हणाले, ‘काळाच्या पुढचा विचार करुन आत्मनिर्भर भारताचे स्वप्न कल्याणी यांनी अनेक दशकांपूर्वी साकार केले

खा. जावडेकर म्हणाले, ‘ बाबा कल्याणी यांच्यासारखे उद्योजक असतील तर भारताचा उद्योग व्यापार जगात पुन्हा बहरेल.

खा. श्रीनिवास पाटील म्हणाले, ‘ मराठी पाऊल पुढे पडत असताना कल्याणी यांच्या तीन पिढ्यांनी दाखवले.

प्रतापराव पवार म्हणाले, ‘ बाबा कल्याणी परिवाराशी आमचा जुना स्नेह आहे. भारत फोर्जने औद्योगिक प्रगतीचा, गुणवत्तेचा मानदंड उभा केला आहे.

-x-